रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड बुधवार । दि. ७ ऑक्टोबर २०२६ । अंक १२१ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### मिसिंग लिंकवर दोन अपघात; सहा जण जखमी

**खोपोली :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंकवर दोन वेगवेगळ्या अपघातांत सहा जण जखमी झाल्याची घटना घडली. लोणावळा हद्दीत मुंबईकडील बाजूस बस आणि ट्रकचा अपघात होऊन पाच जण जखमी झाले. तर पहाटे तीनच्या सुमारास केळी वाहतूक करणाऱ्या पिकअपचा अपघात झाला. या दोन्ही घटनांमुळे काही काळ वाहतूक थांबविण्यात आली होती. मिसिंग लिंकवरील लोणावळा हद्दीत मुंबईकडील बाजूस बस आणि ट्रकची धडक झाली. या अपघातात पाच जण जखमी झाले. जखमींपैकी दोघांना खोपोली नगरपरिषद पान २ वर

### महसूल विभागातील लाचखोरांवर कारवाई

**उरण :** सातबारा उताऱ्यावर वारस नोंद करण्याच्या मोबदल्यात एक लाख रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपावरून नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने उरण तालुक्यात मोठी कारवाई केली. कोप्रोली मंडळ अधिकारी के. डी. मोहिते, चिरनेर तलाठी जयहिंद कोळी आणि कोतवाल नथुराम कातकरी यांच्याविरोधात ही कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मंगळवारी (दि.६) झालेल्या या कारवाईमुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.चिरनेर येथील एका शेतकऱ्याने सातबारा उताऱ्यावर वारस नोंद करण्यासाठी संबंधितांकडून १ लाख रुपयांच्या पान २ वर

# ऐन दुष्काळात एलईडीचा थाट

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यात पाणीटंचाईचे सावट असताना रायगड जिल्हा परिषदेच्या कुंटेबाग (अलिबाग) येथील प्रशासकीय संकुलात उभारण्यात आलेल्या भव्य डिजिटल एलईडी स्क्रीनच्या खर्चावरून प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या स्क्रीनसाठी सुमारे ४० ते ५० लाख रुपये खर्च झाल्याची चर्चा असून, त्याची प्रशासकीय मंजुरी, निविदा प्रक्रिया आणि देयकांचा तपशील मागितल्यानंतर जिल्हा परिषदेच्या विविध विभागांमध्येच जबाबदारीची टोलवाटोलवी सुरू झाल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे.**

या स्क्रीनवर जिल्हा परिषद अध्यक्षांच्या कार्यक्रमांचे आणि प्रसिद्धीपर व्हिडिओचे प्रदर्शन केले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे हा स्क्रीन नेमका कोणी बसवला, कोणाच्या आदेशाने बसवला आणि त्याचा खर्च कोणत्या निधीतून करण्यात आला? याबाबत आता प्रश्न उपस्थित होत आहेत. सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी माहिती अधिकारांतर्गत अर्ज करून स्क्रीनच्या खरेदीपासून ते स्थापनेपर्यंतची संपूर्ण कागदपत्रे मागितली. त्यामध्ये प्रशासकीय मंजुरी, वर्क ऑर्डर, पुरवठादाराची बिले, व्हाउचर, बँक व्यवहार, ई-निविदा प्रक्रिया तसेच वॉरंटी व देखभाल कराराची माहिती मागण्यात आली. मात्र, सामान्य प्रशासन विभागाने हा अर्ज बांधकाम विभाग तसेच ग्रामपंचायत विभागाकडे वर्ग केला.

ग्रामपंचायत विभागाने हे काम आपल्या विभागाशी संबंधित नसल्याचे सांगून अर्ज पुन्हा सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविल्याचे समोर आले आहे. दुसरीकडे, बांधकाम विभागानेही स्क्रीनसाठी लागणाऱ्या दोन लोखंडी पोलव्यतिरिक्त पान २ वर

- **४०-५० लाखांची एलईडी कुणाच्या पैशातून?**
- **रायगड जिल्हा परिषदेत स्क्रीनच्या खर्चाचा हिशोब गुलदस्त्यात**
- **आरटीआयमध्ये विभागांची टोलवाटोलवी**



### स्क्रीन लावणारे गुलदस्त्यात!

संजय सावंत यांच्या अर्जावर सामान्य प्रशासन विभागाने हा अर्ज बांधकाम विभाग तसेच ग्रामपंचायत विभागाकडे वर्ग केला. मात्र, या दोन्ही विभागांनी हात वर केल्याने संपूर्ण जिल्हा परिषदेत खळबळ उडाली आहे. ग्रामपंचायत विभागाने स्पष्ट उत्तर देत कळवले की, हे काम आमच्या विभागाशी निगडीत नाही, त्यामुळे त्यांनी हा अर्ज पुन्हा सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवून दिला. तर बांधकाम विभागानेही, या स्क्रीनसाठी लागणारे दोन लोखंडी पोल वगळता संपूर्ण स्क्रीनसाठी आम्ही कोणताही खर्च केलेला नाही, अशी भूमिका घेतल्याचे समोर आले आहे.

# तलावात बुडून अल्पवयीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रामधरणेश्वर आदिवासीवाडी येथील दोन अल्पवयीन मुलींचा पाझर तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. सोमवारी (दि.५) दुपारी घडलेल्या या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, आदिवासीवाडीवर शोककळा पसरली आहे. अशिका नितीन पवार (८) आणि संजना संदीप पवार (३) अशी मृत्यू झालेल्या मुलींची नावे आहेत.

रामधरणेश्वर हे अलिबागजवळील बामणोली आणि वायशेत गावांच्या परिसरातील निसर्गरम्य ठिकाण आहे. डोंगराळ भागात असलेल्या पाझर तलावापासून काही अंतरावर आदिवासीवाडी आहे. सोमवारी दुपारी या वाडीतील तीन लहान मुली तलाव परिसरात खेळत होत्या. त्यावेळी तोल जाऊन त्या पाण्यात पडल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्घटनेत अशिका पवार आणि संजना पवार यांचा बुडून मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पान २ वर

- **रामधरणेश्वर आदिवासीवाडीवर शोककळा**
- **यापूर्वीही तरुणाचा बुडून मृत्यू**

### तलावाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

रामधरणेश्वर येथील याच पाझर तलावात यापूर्वीही एका तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे तलाव परिसरात सुरक्षेच्या उपाययोजना करणे गरजेचे असल्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. लहान मुलांना धोकादायक पाणवठ्यांपासून दूर ठेवण्यासाठी प्रशासनाने आवश्यक सूचना, सुरक्षा फलक आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

## वेधक

### रिस येथे साडेचार लाखांची घरफोडी

**रसायनी :** रसायनीतील रिस गणेशनगर येथे बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरातील सुमारे साडेचार लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि.४ ते ५ ऑक्टोबर दरम्यान रिस गणेशनगर येथील ही घरफोडी झाली. यावेळी चोरट्याने बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाटात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण सुमारे ४ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

### ‘ज्ञानेश’च्या विरोधात ‘आघाडी’ आक्रमक

**नवी दिल्ली :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी लोकशाहीविरोधात गद्दारी केली आहे, त्यामुळे त्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी आक्रमक मागणी करत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिल्लीत थेट रस्त्यावर उतरून आंदोलन केले. दिल्लीमध्ये इंडिया आघाडीच्या सेव्ह डेमॉक्रसी मार्च दरम्यान राहुल गांधी यांचा आक्रमक अवतार पाहायला मिळाला. दरम्यान, या आंदोलनाला रोखण्यासाठी दिल्ली पोलिसांनी लावलेल्या बॅरिकेड्सवर स्वतः चढत राहुल गांधी यांनी हातात तिरंगा फडकावला. या आंदोलनामुळे दिल्लीतील राजकीय वातावरण प्रचंड तापले असून, संपूर्ण देश ढवळून निघाला आहे.

# आदिवासींचा मुंबईत हुंकार




**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नाशिकहून मुंबईच्या दिशेने निघालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या ‘उलगुलान’ पायी मोर्चावरून मुंबईत वाद निर्माण झाला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी दि.२८ सप्टेंबर रोजी नाशिकहून मोर्चाला सुरुवात झाली. आश्रमशाळा आणि वसतिगृहांमधील विविध प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी विद्यार्थी नाशिकहून मुंबईच्या दिशेने निघाले होते. मुंबईत आझाद मैदानात आंदोलन करण्यासाठी परवानगी मागण्यात आली होती. मात्र, परवानगी नाकारण्यात आल्याने विद्यार्थी मुंबईतील काँग्रेसच्या टिळक भवनमध्ये थांबले होते. मात्र, यावेळी पोलिसांनी कारवाई केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

विविध मागण्यांसाठी गेल्या ४२ दिवसांपासून आंदोलन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांनी नाशिकहून मुंबईच्या आझाद मैदानाकडे पायी मोर्चा सुरू केला होता. यादरम्यान, मुंबईत आझाद मैदानात आंदोलन करण्यासाठी परवानगी नाकारण्यात आल्याने विद्यार्थी मुंबईतील काँग्रेसच्या टिळक भवनमध्ये थांबले होते. मात्र, यावेळी पोलिसांनी कारवाई केल्याचे गंभीर आरोप विद्यार्थ्यांकडून करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, पहाटेच्या सुमारास पोलीस टिळक भवनमध्ये आले. सुरुवातीला त्यांनी विद्यार्थ्यांचे फोटो काढले आणि त्यानंतर काही विद्यार्थिनींना ताब्यात घेण्यात आल्याचा दावा करण्यात आला. वॉशरूममधून बाहेर आल्यानंतर तीन विद्यार्थिनींना पान २ वर

# शेकाप मैदानात; रायगडात जनजागृतीचा एल्गार

**स्मार्ट मीटर विरोधात लढ्याची तयारी; संघटनबांधणीसाठी तालुकानिहाय बैठका**



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

जनतेच्या प्रश्नांवर पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत शेतकरी कामगार पक्षाने रायगडात जनजागृतीचा एल्गार पुकारला आहे. पक्षाच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या जिल्हा जनजागृती दौऱ्याला तालुकानिहाय कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, स्मार्ट मीटर आणि आगामी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर शेकापची संघटनात्मक ताकद दाखवून देण्याची तयारी सुरू झाली आहे.

या दौऱ्याला दि.५ ऑक्टोबर रोजी पोलादपूर, महाड, श्रीवर्धन, म्हसळा, तळा आणि मुरुड तालुक्यांपासून सुरुवात झाली. त्यानंतर दि.६ ऑक्टोबर रोजी माणगाव, रोहा, सुधागड-पाली, खालापूर, कर्जत आणि पेण येथे प्रमुख कार्यकर्त्यांच्या जनजागृतीच्या बैठका घेण्यात आल्या. या बैठकींमध्ये शेकापच्या राज्य प्रवक्त्या तथा सोशल मीडिया सेलच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील, जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, जिल्हा महिला पान २ वर

### अलिबागमध्ये आज बैठक

अलिबाग तालुक्याची जनजागृती बैठक आज, ७ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता शेतकरी भवन, अलिबाग येथे होणार आहे. संघटनबांधणी, स्मार्ट मीटरविरोधातील जनजागृती आणि आगामी आंदोलनांची दिशा यावर बैठकीत निर्णायक चर्चा होणार आहे. रायगडातील प्रत्येक तालुक्यात संघटना मजबूत करून जनतेच्या प्रश्नांवर संघर्ष उभारण्याच्या तयारीने शेकापचा जनजागृती दौरा आता निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे.

# कुंदनमलचा बंगला महसूलच्या रडारवर?

**सीआरझेडचे उल्लंघन करून अनधिकृत बांधकाम केल्याचा ठपका**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील कोळगाव येथील समुद्रकिनारी रमेश कुंदनमल यांनी बंगला बांधला आहे. सीआरझेडचे उल्लंघन करून अनधिकृत बांधकाम केल्याचा ठपका महसूल विभागाने ठेवला आहे. त्यामुळे कुंदनमल यांचा बंगला रडारवर असल्याचे बोलले जात आहे. मात्र त्यांनी १९७३ मध्ये जागा घेऊन बांधकाम केल्याने ही जागा सीआरझेडमध्ये त्या कालावधीत मोडत नसल्याचे कुंदनमल यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता महसूल विभाग काय भूमिका घेणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

मांडवा परिसरात समुद्रकिनारी अलिशान बंगले बांधण्याचे स्वप्न अनेकांचे आहेत. वेगवेगळे सेलिब्रीटीसह क्रीडा, व्यावसायिक क्षेत्रातील धनदांडग्यांनी या भागात मोठ्या प्रमाणात जमीनी खरेदी करून त्याठिकाणी अलिशान बंगले बांधले आहेत. अलिबाग तालुक्यातील कोळगांव पान २ वर



> कुंदनमल यांचा १९७३ ते १९७४ मध्ये बांधलेला बंगला आहे. वाढीव काम केले आहे. साधारणपणे १९८४ येणे साठी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज केला होता. बांधकाम तोडण्याबाबत त्यांना नोटीस दिली होती. मात्र ते सिव्हील न्यायालयात गेले आहेत. त्यामुळे तुर्तास स्थगिती आहे.
>
> **– मुकेश चव्हाण, उपविभागीय अधिकारी**

> कोळगांव येथील समुद्रकिनाऱ्यापासून काही अंतरावर गट नं. ३२२ मध्ये साधारणपणे १५ गुंठे जमीन घेतली. त्याठिकाणी बांधकाम केले आहे. १९७३ मध्ये ही जागा घेऊन बांधकाम केले. सीआरझेड उल्लंघन करण्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. मात्र याबाबत न्यायालयात दाद मागितली आहे. मिळालेल्या माहितीनुसार,१९९१ पुर्वीचे बांधकाम सीआरझेडमध्ये येत नाही. त्यामुळे माझे बांधकाम सीआरझेडमध्ये येत नाही.
>
> **– रमेश कुंदनमल,** व्यावसायिक

### खोपोलीत नवजात बाळाचा मृत्यू

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

लग्नानंतर तब्बल सात वर्षांच्या प्रतीक्षेनंतर घरात चिमुकलीचे आगमन झाले आणि कुटुंबीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला. मात्र, हा आनंद अवघ्या नऊ दिवसांतच दुःखात बदलला. खोपोलीतील सुमित्रा राज रुग्णालयात नवजात बाळाचा मृत्यू झाल्याने नातेवाईकांनी रुग्णालयात धाव घेत संताप व्यक्त केला. उपचारांबाबत नातेवाईकांनी आक्रमकपणे जाब विचारल्यानंतर परिस्थिती पान २ वर

# थळच्या तलाठ्यासह कोतवाल एसीबीच्या जाळ्यात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**



अलिबाग तालुक्यातील थळ येथील तलाठी आणि कोतवाल लाच प्रकरणी रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी (दि.६) लाच घेताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. या कारवाईने लाच घेणाऱ्यांना दणका मिळाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, थळ येथील तलाठी कार्यालयात तक्रारदार यांनी जमीन वर्ग दोन वरून एक करण्यासाठी अर्ज केला होता. ही नोंद करण्यासाठी तलाठ्याने तक्रारदार यांच्याकडून १ हजार रुपयाची लाच मागितली होती. त्यामध्ये कोतवालचाही सहभाग असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सांगण्यात आले. तक्रारीनुसार, पान २ वर

**महानगर गॅस लिमिटेड**

एमजीएल युनिट ३०१-३०४, थर्ड लेवल, बि विंग, टॉवर १, सीवुड्स ग्रँड सेंट्रल, नवी मुंबई-४०० ७०६, सीआयएन क्र.: L40200MH1995PLC088133

महानगर गॅस

**एमजीएलला कॉम्प्रेस्ड बायो-गॅसचा (सीबीजी) पुरवठा करण्यासाठी अर्ज**

महानगर गॅस लिमिटेड (एमजीएल), भारतातील अग्रणी नागरी गॅस वितरण कंपनी, ही मुंबई, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी, धाराशिव, लातूर, दावणगिरी आणि चित्रदुर्ग अशा विविध भौगोलिक भागांमधील **३२.५ लाखपेक्षा अधिक घरांना आणि ५२२ सीएनजी स्टेशन्सना** डोमेस्टिक गॅस आणि सीएनजीचा पुरवठा करण्याचा व्यवसाय करते.

एमजीएल उर्जेच्या अधिक स्वच्छ आणि नूतनीकरणयोग्य स्त्रोतांच्या उपयोगाचा प्रचार करण्यासाठी समर्पित आहे आणि त्यासाठी सीबीजी विकासकांद्वारा कृषि आणि कृषि व्यतिरिक्त पशूखाद्याद्वारा तयार केल्या जाणाऱ्या **कॉम्प्रेस्ड बायो-गॅस (सीबीजी)** मिळविण्याच्या संधींच्या शोधात आहे.

त्यानुसार, **एमजीएलद्वारा त्यांना दीर्घ मुदतीसाठी सीबीजीचा पुरवठा** करण्याची इच्छा असलेल्या विद्यमान/भावी सीबीजी विकासकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

खालील जिल्ह्यांमध्ये उत्पादन सुविधा असलेल्या सीबीजी उत्पादकांना प्रकल्प **विकासकांना, एमजीएलला सीबीजीचा** पुरवठा करण्यासाठी त्यांचा प्रस्ताव सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. | **महाराष्ट्र - मुंबई, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी, धाराशिव, लातूर.** |
| २. | **कर्नाटक - दावणगिरी आणि चित्रदुर्ग** |

इच्छुक अर्जदारांनी त्यांच्या **सीबीजी उत्पादन सुविधेचे ठिकाण, पशूखाद्य, विद्यमान प्रस्तावित क्षमता, अपेक्षित सीबीजी उत्पादन, प्रकल्पाची स्थिती, कार्यान्वितीकरणाचे वेळापत्रक आणि प्रस्तावित पुरवठा व्यवस्था यासह संपूर्ण तपशिल** info.cbg@mahanagargas.com. येथे सादर करावा.

काही चौकशी करायची असल्यास, कृपया **(०२२)६५४५ ९६००** या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा **info.cbg@mahanagargas.com** येथे ई-मेल पाठवावे.

**कोणतेही कारण न देता कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार एमजीएल राखून ठेवत आहे.**

**स्व. प्रदीप पूर्णेकरांच्या कुटूंबियांची सांत्वनपर भेट | मानपाडा येथील राहत्या घरी वाहिली श्रद्धांजली**

# आगरी समाजाचा लढवय्या आवाज हरपला : जयंत पाटील

**। ठाणे । विशेष प्रतिनिधी ।**

आगरी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत राहणारे, वंचित व उपेक्षित घटकांच्या हक्कांसाठी आवाज उठविणारे तसेच नशामुक्तीच्या चळवळीत सक्रियपणे योगदान देणारे सामाजिक कार्यकर्ते स्व. प्रदीप पूर्णेकर यांच्या निधनाने सामाजिक चळवळीची मोठी हानी झाली आहे, अशा शब्दांत शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी श्रद्धांजली अर्पण केली. जयंत पाटील यांनी मंगळवारी (दि.६) मानपाडा येथील पूर्णेकर यांच्या पान २ वर





### सामाजिक कार्याची मशाल विझू देणार नाही

तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात जाऊ नये, समाजामध्ये व्यसनमुक्त वातावरण निर्माण व्हावे, यासाठी पूर्णेकर यांनी नशामुक्तीच्या चळवळीत सक्रिय भूमिका बजावली. सामाजिक प्रश्नांकडे केवळ तक्रारीच्या दृष्टीने न पाहता त्यावर जनजागृती आणि सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याची त्यांची भूमिका होती. आगरी समाजाच्या हक्कांसाठी आणि परिसरातील सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी पूर्णेकर यांनी कायम भूमिका घेतली. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळावा, त्याच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, ही त्यांची भूमिका होती. पुर्णेकर यांचे सामाजिक कार्य आणि विचार पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. यासाठी शेतकरी कामगार पक्ष पूर्णेकर परिवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, अशी ग्वाही जयंत पाटील यांनी दिली.

पान १ वरुन

## मिसिंग लिंकवर दोन अपघात; सहा जण जखमी

रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. एकाला खोपोलीतील खासगी रुग्णालयात, तर दोघांना पुढील उपचारासाठी कामोठे येथील रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, पहाटे तीनच्या सुमारास याच मिसिंग लिंकवर केळी वाहतूक करणाऱ्या पिकअपचा अपघात झाला. या घटनेत चालक समीर शेख जखमी झाला असून, त्याच्यावर खोपोली नगरपरिषद रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दोन्ही अपघातांनंतर महामार्गावरील वाहतूक काही काळ थांबविण्यात आली होती.

## महसूल विभागातील लाचखोरांवर कारवाई

लाचेची मागणी होत असल्याची तक्रार नवी मुंबई लाचलुचपत विभागाकडे केली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर पथकाने चिरनेर येथील तलाठी कार्यालयात सापळा रचला.
नवी मुंबई लाचलुचपत विभागाचे उपअधीक्षक धर्मराज सोनके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. लाचेची रक्कम स्वीकारण्याच्या कारवाईदरम्यान संबंधितांना पथकाने ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना उरण पोलीस ठाण्यात नेण्यात आले असून, पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे महसूल विभागातील कामकाजावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या पूर्वीच्या कार्यकाळातील कामकाजाचीही चौकशी करण्याची मागणी स्थानिक पातळीवर होत आहे.

के.डी. मोहिते यांनी २०२३-२४ मध्ये सजा चिरनेर तलाठी कार्यालयाचा कारभार पाहिल्याचा दावा करण्यात येत असून, त्यांच्या त्या काळातील पदस्थापना, कार्यक्षेत्र आणि कामकाजाच्या नोंदी तपासण्याची मागणी होत आहे. सातबारा, फेरफार आणि वारस नोंदीसारख्या कामांसाठी शेतकऱ्यांना महसूल कार्यालयात वारंवार हेलपाटे मारावे लागतात. अशा प्रकरणांत लाचेची मागणी होत असल्यास त्यावर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. या कारवाईमुळे उरण तालुक्यातील महसूल यंत्रणेच्या कारभाराची सखोल तपासणी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## ऐन दुष्काळात एलईडीचा थाट

स्क्रीनसाठी कोणताही खर्च केलेला नसल्याची भूमिका घेतल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे आता जर ग्रामपंचायत विभाग आणि बांधकाम विभाग या खर्चाशी संबंधित नसतील, तर स्क्रीनची खरेदी आणि स्थापना नेमक्या कोणत्या विभागाने केली? हा सवाल निर्माण झाला आहे.

सरकारी निधीतून लाखो रुपयांचा खर्च झाला असल्यास त्यासाठी प्रशासकीय मंजुरी, निविदा, कार्यादेश आणि देयकांची नोंद असणे अपेक्षित आहे. त्यामुळे स्क्रीनच्या खर्चाची अधिकृत नोंद कोणत्या विभागाकडे आहे, निधी कोणत्या लेखाशीर्षातून वापरण्यात आला आणि संबंधित देयक कोणाला अदा करण्यात आले, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. दुसरीकडे, स्क्रीनचा वापर प्रशासकीय जनजागृती आणि शासकीय योजनांच्या माहितीप्रसारासाठी होतो की पदाधिकाऱ्यांच्या प्रसिद्धीसाठी, याचीही स्पष्टता होणे गरजेचे आहे. जनतेच्या पैशातून झालेल्या खर्चाचा हिशोब पारदर्शक असणे आवश्यक असल्याने या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. यात्प्रकरणी संजय सावंत अपील करणार असून, आता अधिकृत कागदपत्रे समोर आल्यानंतरच या लाखो रुपयांच्या खर्चाचे नेमके वास्तव स्पष्ट होणार आहे.

## तलावात बुडून अल्पवयीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू

दोन्ही मुलींचे मृतदेह सायंकाळी अलिबाग जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आले. या घटनेनंतर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात शोक व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## शेकाप मैदानात; रायगडात जनजागृतीचा एल्गार

आघाडी प्रमुख शिवानी जंगम आणि राज्य कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक यांनी कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला. बैठकांमध्ये स्मार्ट मीटरचा प्रश्न गावागावात नेण्यावर विशेष भर देण्यात आला. वाढीव वीजबिले, स्मार्ट मीटरबाबतच्या तक्रारी आणि ग्राहकांच्या प्रश्नांवर जनजागृती करून आगामी काळात व्यापक आंदोलन उभारण्याबाबत चर्चा झाली.

**तालुकानिहाय संघटनबांधणीला वेग**

जनजागृती दौऱ्याच्या माध्यमातून केवळ बैठका न घेता गावागावात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत पक्षाची एकजूट दाखवून दिली. जनतेचे प्रश्न घेऊन रस्त्यावर उतरणार आणि संघर्ष केल्याशिवाय मागे हटणार नाही, असा निर्धार शेकाप कार्यकर्त्यांनी बैठकीतून व्यक्त करण्यात आला.

## थळच्या तलाठ्यासह कोतवाल एसीबीच्या जाळ्यात

रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या उप अधीक्षक सरिता भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचण्यात आला. अखेर मंगळवारी थळमधील तलाठी कार्यालयात तलाठी अमृत चौगुले याला १ हजार रुपयाची लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले. तलाठ्यासह कोतवाल राजेंद्र पाटील याला ताब्यात घेण्यात आले असून, दोघांच्या विरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## खोपोलीत नवजात बाळाचा मृत्यू

पाहता रुग्णालय परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, शाहिस्ता मुस्तफा जळगावकर यांना लग्नानंतर सात वर्षांनी अपत्यप्राप्ती झाली होती. २९ सप्टेंबर रोजी प्रसूतीसाठी त्यांना सुमित्रा राज रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली आणि त्यानंतर बाळाचा जन्म झाला. जन्मानंतर बाळाची प्रकृती व्यवस्थित असल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. दरम्यान, नवव्या दिवशी बाळाला तपासणीसाठी पुन्हा रुग्णालयात आणण्यात आले. यावेळी बाळाला कावीळ झाल्याचे सांगून औषध देण्यात आल्याचे नातेवाईकांनी सांगितले. त्यानंतर काही वेळातच बाळाच्या नाकातून आणि तोंडातून रक्तस्राव झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर बाळाचा मृत्यू झाला. त्यानंतर बाळाचे नातेवाईक रुग्णालयात दाखल झाले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर खालापूर तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल, खोपोलीचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे, तसेच खालापूरचे पोलीस निरीक्षक प्रदीप रायणावर यांनी रुग्णालयात भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

दरम्यान, या प्रकरणात दोन्ही बाजूंकडून एकमेकांविरोधात तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रकरणाला वेगळे वळण मिळाले असून, पोलिसांकडून दोन्ही बाजूंच्या तक्रारींची दखल घेत अधिक तपास सुरू आहे.

## आदिवासींचा मुंबईत हुंकार

ताब्यात घेतल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. यावेळी महिला पोलीस उपस्थित होत्या, मात्र विद्यार्थ्यांना नेमके कुठे घेऊन जात आहोत, याची माहिती देण्यात आली नसल्याचा आरोप आहे. काही विद्यार्थ्यांनी पोलिसांकडून धक्काबुक्की आणि गैरवर्तन झाल्याचाही दावा केला आहे. तसेच, रात्री २.०० वाजण्याच्या सुमारास काही विद्यार्थ्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना एका ठिकाणी न नेता भिवंडी आणि परिसरात वाहनातून फिरवण्यात आले. काही विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली, चक्कर आली आणि काही जण बेशुद्ध झाल्याचा दावा करण्यात आला. त्यांना रुग्णालयात नेण्यासाठी विनंती करूनही तातडीची मदत मिळाली नसल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. काही विद्यार्थ्यांना अखेर कल्याण बायपासजवळ सोडण्यात आलं आणि त्यानंतर सहकाऱ्यांनी त्यांना रुग्णालयात नेल्याचं सांगण्यात आले.

या आंदोलनामागे विद्यार्थ्यांनी वसतिगृह आणि आश्रमशाळांच्या परिस्थितीचे मुद्दे मांडले आहेत. काही वसतिगृहांमध्ये पाणी, वीज, स्वच्छतागृह, गाद्या आणि पांघरुणांसारख्या मूलभूत सुविधांची कमतरता असल्याचा विद्यार्थ्यांचा दावा आहे. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना पाणी बाहेरून आणावे लागते, तर सेंट्रल किचनमधून येणारे जेवण वेळेत आणि चांगल्या दर्जाचे मिळत नसल्याचेही त्यांनी सांगितले. चोपडा, शहादा, जळगाव, नंदुरबार आणि इतर ठिकाणच्या वसतिगृहांची अवस्था विद्यार्थ्यांनी सांगितली. काही ठिकाणी स्वच्छतागृहांची संख्या कमी असून, इमारतींची दुरवस्था आणि छत गळण्याच्या समस्याही असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. मुलींना त्यांच्या तक्रारी मांडल्यामुळे लक्ष्य केले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी आदिवासी विकास मंत्री, सचिव आणि आयुक्तांबाबतही मागण्या मांडल्या आहेत. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे.

## आगरी समाजाचा लढवय्या आवाज हरपला : जयंत पाटील

राहत्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांनीस्व. प्रदीप पूर्णेकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून पूर्णेकर परिवाराच्या दुःखात आपण आणि शेतकरी कामगार पक्ष सहभागी असल्याचे सांगितले. पूर्णेकर परिवाराची सामाजिक बांधिलकीची परंपरा मोठी आहे. समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहत त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी सातत्याने काम केले. आगरी समाजाच्या प्रश्नांना केवळ सामाजिक पातळीवर न ठेवता त्यांना न्याय, हक्क आणि विकासाच्या व्यापक प्रश्नांशी जोडण्याचे काम पूर्णेकर यांनी केले. समाजातील गरजू आणि वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर स्थानिक पातळीवर आवाज उठविताना त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. मानपाडा परिसरातील नागरिकांच्या विविध प्रश्नांबरोबरच प्रस्तावित क्लस्टर प्रकल्पाच्या अनुषंगाने स्थानिक नागरिकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी स्व. प्रदीप पूर्णेकर यांनी घेतलेली भूमिका महत्त्वपूर्ण होती, असे जयंत पाटील यांनी नमूद केले.

यावेळी पूर्णेकर परिवारातील सदस्य, स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच शेतकरी कामगार पक्षाचे कार्यालयीन चिटणीस ॲड. राजू कोरडे, ठाणे जिल्हा चिटणीस प्रसाद साळवी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## कुंदनमलचा बंगला महसूलच्या रडारवर?

येथील गट नं. ३२२ मध्ये रमेश कुंदनमल यांनी जागा घेऊन बांधकाम केले. मात्र सीआरझेडचे उल्लंघन करून विकास केल्याची तक्रार मागील वर्षी करण्यात आली. यानंतर पुढील कार्यवाहीसाठी अलिबागच्या उपविभागीय अधिकारी कार्यालयात हा प्रस्ताव पाठविण्यात आला. पत्रात नमुद केलेल्या मुद्यानुसार आवश्यक कागदपत्रे कार्यालयात सादर करण्याचे पत्र उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडून कुंदनमल यांना देण्यात आले. त्यानंतर सीआरझेडचे उल्लंघन करून बांधकाम केल्याचा ठपका ठेवत उपविभागीय अधिकारी यांनी बांधकाम निष्कासित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खर्चाचे अंदाजपत्रक सादर करण्याचे पत्र पाठविले. त्यानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता एम.एम. धायतडक यांनी बांधकाम निष्कासीत करण्याचे अंदाजपत्रक महसूल कार्यालयाला सादर केले. त्यामध्ये कोळगांव येथील गट नं. ३२२ च्या बांधकाम निष्कासीतसाठी पाच लाख ११ हजार १८१ रुपये अंदाजीत खर्च येण्याची शक्यता वर्तविली आहे. त्यामुळे कुंदनमल यांचा बंगला महसुल विभागाच्या रडारवर असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

---

### कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

**जाहीर सूचना**

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत खोपोली (हाळ बुद्रुक) येथील योजनेअंतर्गत खुल्या भूखंडाच्या विक्री करीता सोडत काढण्यात आली होती.

सदर जाहीर सूचनेद्वारे सूचित करण्यात येते कि, खाली नमूद भूखंड क्रमांकाच्या यशस्वी लाभार्थ्यांनी म्हाडा कार्यालयाशी संपर्क साधावा.

**अत्यल्प उत्पन्न गट भूखंड क्र.** - ७१, ८९, ११२, ११८, १२४, १३७, १४९, २५९, १५२, ६९, ७७, ९७, ९८, ९९, १०९, ११७, १२२, १२५, १२८, १२९, १३३, १३५, १३९, १४४, १४५, १५०, १५१, १५७, १५८, १५९, २६०, २६३, २६४, २६५, २६६, २६७, २६८, २६९, **एकूण ३८ भूखंड**

**अल्प उत्पन्न गट भूखंड क्र.** - ५४, १९३, १९४, १९९, २०१, २१०, २७८, ३०२, ३२३, ३१७, ३६१, ३७२, ३७७, ३७९, ३८७, ४४, १८७, २७३, ३१४, ३४४, ३६८, ३२, १९१, २०७, २३४, २५३, ३११, ३२०, ३२६, ३६६, ३८६, ३९०, ३९२- **एकूण ३३ भूखंड**

**मध्यम उत्पन्न गट भूखंड क्र.** २२, १८२, ३५९, १०, ०४, २० एकूण ०६ भूखंड

**व्यापारी भूखंड C-२-A, C-२-B- एकूण ०२ भूखंड**

मौजे खोपोली (हाळ बुद्रुक), ता.खालापूर, जि.रायगड येथील भूखंड योजनेतील वरीलप्रमाणे भूखंड क्रमांकाचे लाभार्थ्यांनी त्यांचेकडे असलेल्या सर्व कागदपत्रांसह, मुख्य अधिकारी/कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, कक्ष क्र १६८, पोट मजला, म्हाडा कार्यालय, कलानगर, वांद्रे (पू) यांचे कार्यालयातील संबंधित लिपिक यांचेशी सदर जाहीर सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत तात्काळ संपर्क साधावा. अन्यथा या कार्यालयाकडील उपलब्ध अभिलेखानुसार लाभार्थीची नोंद घेवून उर्वरित भूखंडाच्या विल्हेवाटीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. तद्नंतर भूखंडाची मालकी/भाडेपट्टयाबाबत कुठलाही दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(डॉ. विशाल राठोड)**
**मुख्य अधिकारी.**
**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**

म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
**CPRO/A/730**
Follow us : mhadaofficial

---

MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

### Tender Notice

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/ACCU CHECKING OF METERS/T-09/2026-27 | Contract for Accuchecking Of Single Phase And Three Phase Meters Under Goregaon Division. | 10.00 | 10,000/- | 1000+18 %GST= 1180/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 07.10.2026 to Dt. 15.10.2026. Submission of Bid is up to Dt. 16.10.2026 till 15.00 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Dy. Executive Engineer Tel No. 9029145594. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**PRO No. 106** **Executive Engineer, Goregaon Division**

---

सत्यमेव जयते

### भारत सरकार, रेल्वे मंत्रालय

**रेल्वे भरती बोर्ड**

**केन्द्रीकृत रोजगार अधिसूचना (सीईएन) क्रं. 06/2026**

**अतांत्रिक लोकप्रिय श्रेणी (पदवीधर) मधील विविध पदांसाठी भरती**
**(संक्षिप्त सूचना)**

पात्र उमेदवारांकडून **अतांत्रिक लोकप्रिय श्रेणी (पदवीधर)** मधील विविध पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व प्रकारच्या पात्रता पूर्ण केलेले अर्ज **फक्त ऑनलाइन माध्यमातून** सादर करावेत. **(https://www.rrbapply.gov.in).**

| | |
|---|---|
| अर्ज सुरू होण्याचा दिनांक | 08.10.2026 (संभावित) |
| अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | 06.11.2026 (23:59 वाजेपर्यंत) (संभावित) |

| पदाचे नाव | वेतन श्रेणी 7व्या सीपीसी नुसार | वैद्यकीय निकष | वय (01.01.2027 रोजी) | एकूण संभावित रिक्त पदे (सर्व आरआरबी) |
|---|---|---|---|---|
| अतांत्रिक लोकप्रिय श्रेणी (पदवीधर) मधील विविध पदे | पे लेवल–5 व पे लेवल–6 | विस्तृत सीईएन जाहिराती नुसार | विस्तृत सीईएन जाहिराती नुसार | 3,477 |

सूचनाः
1. उमेदवारांना सल्ला देण्यात येतो की, ऑनलाइन अर्ज भरताना आधार पत्राचा वापर करून आपले प्राथमिक तपशील सत्यापित करून घ्यावेत, जेणेकरून गैर–आधार सत्यापित अर्जांसाठी भरती प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर होणाऱ्या विस्तृत तपासणीमुळे होणारी गैरसोय व विलंब टाळता येईल.
2. आधार पत्राचा वापर करून यशस्वी सत्यापन सुनिश्चित करण्यासाठी, आधारमध्ये नोंदविलेले नाव व जन्मतारीख 10वीच्या उत्तीर्ण प्रमाणपत्रातील पूर्ण नाव व जन्मतारखेशी 100% जुळण्यासाठी अद्ययावत असणे आवश्यक आहे. तसेच, ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी आधारमधील नवीनतम छायाचित्र आणि नवीनतम बायोमेट्रिक्स (फिंगरप्रिंट व आयरिस) देखील अद्ययावत करणे आवश्यक आहे.
3. ही सूचना केवळ संक्षिप्त स्वरूपाची आहे. संभाव्य उमेदवारांना आगामी विस्तृत केंद्रीकृत रोजगार अधिसूचना (CEN) आणि अर्जासाठी आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे याबाबत स्वतंत्रपणे सूचना देण्यात येईल. हे स्पष्ट करण्यात येते की भरतीशी संबंधित सर्व नियम, अटी, पात्रता निकष, प्रक्रिया व इतर आवश्यक बाबी सीईएन क्र. 06/2026 (वेळोवेळी जारी होणाऱ्या शुद्धिपत्रकांसह) नुसारच लागू असतील. ही माहिती विशेषतः सर्व RRBच्या एकत्रित वेबसाइट **https://rrb.indianrailways.gov.in** वर प्रकाशित केली जाईल. उमेदवार या एकत्रित वेबसाइटवरून संबंधित RRBच्या स्वतंत्र वेबसाइटला भेट देऊ शकतात.

**संदर्भः आरआरबी/पीआरवाईजे/जाहिरात/सीईएन–06/2026,**
**दिनांक 07.10.2026**

**अध्यक्ष,**
**रेल्वे भरती बोर्ड**

**"दलाल, फसवणूक करणारे, नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देणारे आणि ठगांपासून सावध राहा"** **DE/639**

---

दिनांक : ०७ ऑक्टोबर २०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - शिंगढोळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) विद्या वासुदेव पाटील<br>२) वासुदेव नारायण पाटील | ५८ | १ | ८-२३-०० | ३ | ४० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक:-०७/१०/२०२६

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चाफेवाडी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ५/३ | एकूण क्षेत्र २-२८-०० हे.आर | १.५६ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-७/१०/२०२६

सही
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

---

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| युसुफ सफर अली कपाडीया | २७ | १ | ०-७७-४० | २.६२ |
| | २८ | ० | ०-१०-१० | ०.२८ |
| | २८ | २ | ०-७४-०० | ०.७२ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : ०७/१०/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो. : ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

---

दिनांक : ०७ ऑक्टोबर २०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे ताडवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| पुनम संदिप शर्मा | १०२ | १६७ | २६४.०० | २६-४० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:-मु.पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही/ -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :-०७/१०/२०२६

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खालील वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी त्या मिळकतीचे मालक श्री. अंकुश रघुनाथ घोडविंदे यांचे कडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे किकवी, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १४६ | ५५ | ६.३०.०० | ०.६३ |

तदंगभूतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा - कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ०७-१०-२०२६

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं - ९५६१७१९४९४
९०११७१६००१

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) अनिता गजानन चोरघे, २) फशी शशिकांत पाटील ३) अंजना बाळाराम भोईर, ४) अनुराधा शांताराम वांगीलकर ५) संजय शांताराम वांगीलकर,६) रतन नंदकिशोर शिलीमकर सर्व रा. तुरमाले, पो. शिरढोण ता. पनवेल, जि. रायगड असून त्यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरवलेला असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| वडवली ता. पनवेल जि.रायगड | १८/५ | ०-५३-१०<br>पो.ख. ०-०३-५०<br>एकूण ०-५६-६० | ६.३१ |

सदर वर केलेल्या मिळकतीमधील विद्यमान मालक यांच्या मालकीचे ०-३३-१० हे.आर.पॉ. पो.ख. ०.०३ ५० हे. आर. पॉ. एकूण क्षेत्र ०-३६-६० हे.आर.पॉ. ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसल्या कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत आणून द्यावीत. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख ०६/१०/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
पत्ता - दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर,
ता. अलिबाग जि. रायगड

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मानिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालकांकडुन त्यांना प्राप्त असलेल्या सर्व हक्कांसह विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| महेंद्र धोंडू म्हसे | ११ | १ | ०-४६-०० | ०-५८ |
| गुरुनाथ सदानंद मसणे | १३ | १३ | ०-३९-०० | ०-२५ |
| स्नेहल प्रमोद पिंगळे | ११ | ३ | ०-२४-०० | १-८७ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०७/१०/२०२६

**ॲड. सी. बी. ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१.

## निवडक



### देवीच्या जागरासाठी पनवेलकर सज्ज

**पनवेल :** पुढील रविवारी घटस्थापनेने नवरात्रोत्सवाला सुरुवात होणार असल्याने पनवेल, नवीन पनवेल आणि खांदा कॉलनी परिसरात उत्सवाची लगबग सुरू झाली आहे. देवीच्या जागरासाठी विविध मंडळांकडून जय्यत तयारी करण्यात येत असून, ठिकठिकाणी नवरात्रोत्सवाचे मंडप उभारण्याच्या कामाला वेग आला आहे. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत गरबा आणि दांडियाचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक व तरुणाई सहभागी होत असल्याने मंडळांकडून आकर्षक आणि प्रशस्त मंडप उभारले जात आहेत. मंडपाची सजावट, विद्युत रोषणाई, ध्वनिव्यवस्था तसेच देवीच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापनेसाठी आवश्यक तयारी सुरू आहे. नवरात्रोत्सव जवळ येताच बाजारपेठांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. महिला आणि तरुणींची गरबा ड्रेस, घागरा-चोळी, दागिने तसेच विविध पारंपरिक वस्तूंच्या खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे. दरम्यान, उत्सवात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होत असल्याने मंडळांनी वाहतूक, सुरक्षाव्यवस्था आणि स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. घटस्थापनेपासून पुढील नऊ दिवस देवीचा जागर, आरती, भजन, गरबा आणि दांडियामुळे पनवेल परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे.



### के.एम.सी. महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

**खोपोली :** मराठी भाषेला समृद्ध आणि संपन्न साहित्यिक वारसा लाभला असून, तिची प्राचीन परंपरा नव्या पिढीने समजून घेणे आवश्यक आहे. मराठी भाषेच्या विकासासाठी प्रत्येकाने योगदान देतानाच वाचन संस्कृती आणि वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी विद्यार्थी व रसिक वाचकांनी उत्तम ग्रंथांचे नियमित वाचन करावे, असे आवाहन खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह किशोर पाटील यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या निर्देशानुसार ३ ऑक्टोबर रोजी अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस के.एम.सी. महाविद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अबूबकर जळगावकर, किशोर पाटील, दिलीप पोरवाल, भास्कर लांडगे, संजय बोंदार्डे, प्रा. डॉ. मकरंद वझल, डॉ. नरेंद्र पवार आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाच्या मराठी भाषा व साहित्य मंडळ, सांस्कृतिक विभाग, ग्रंथालय आणि आयक्यूएसीच्या सहकार्याने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनाला विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक आणि रसिक वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपप्राचार्य डॉ. विकास सूर्यवंशी, डॉ. गणपती मुळीक, डॉ. चेतन सोनवणे, डॉ. भाऊसाहेब नन्नवरे, प्रा. प्रिया नेरलेकर, डॉ. अमोल नागरगोजे आणि प्रा. विठ्ठल जाधव यांनी परिश्रम घेतले.




### नवी मुंबई विमानसेवेत 'फ्लाय ९१'ची भर

**पनवेल :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या देशांतर्गत हवाई सेवेत फ्लाय ९१ या विमान कंपनीची भर पडली आहे. गोवा मुख्यालय असलेल्या या कंपनीच्या विमानाचे नवी मुंबई विमानतळावर प्रथमच आगमन झाले. हैदराबादहून आलेल्या विमानाचे विमानतळ प्रशासनाकडून जलतोफेच्या सलामीने स्वागत करण्यात आले. फ्लाय ९१च्या हिवाळी वेळापत्रकानुसार नवी मुंबईहून सिंधुदुर्ग, जळगाव, गोवा आणि लक्षद्वीपमधील अगत्ती या चार ठिकाणी थेट विमानसेवा सुरू होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रासह गोवा आणि पश्चिम किनारपट्टीवरील पर्यटन व व्यावसायिक प्रवासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. नवी मुंबई हे फ्लाय ९१ चे देशातील १४ वे आणि महाराष्ट्रातील पाचवे गंतव्यस्थान ठरले आहे. कंपनीच्या हवाई जाळ्यात गोवा, सिंधुदुर्ग, जळगाव, सोलापूर, पुणे, बंगळुरू, हैदराबाद, अगत्ती, कोची, हुबळी, राजमुंद्री, विजयवाडा आणि तिरुपती या शहरांचा समावेश आहे. फ्लाय ९१ ने विस्ताराच्या दृष्टीने ४० एटीआर-७२-६०० विमानांची ऑर्डर दिली आहे.नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर व्यावसायिक विमानसेवा सुरू झाल्यापासून आतापर्यंत ३२ लाखांहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला आहे. २५ डिसेंबर २०२५ रोजी सेवा सुरू झाल्यानंतर विमानतळाच्या प्रवासीसंख्येत सातत्याने वाढ झाली आहे.

# स्मार्ट मीटर विरोधात जनआंदोलन करणार

**। माणगाव, प्रतिनिधी ।**

**स्मार्ट मीटरमुळे विजेचे बील भरमसाठ येत आहे. सर्वसामान्य नागरिकांसह गोरगरीब जनता मेटाकुटीला आली आहे. महिन्याचा आर्थिक ताळमेळ बिघडू लागला आहे. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाने जनतेच्या प्रश्नासाठी आता रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. स्मार्ट मीटरविरोधात शेकाप जनआंदोलनाच्या पावित्र्यात आहे. येत्या काळात दक्षिण रायगडमध्ये पक्षातर्फे मोठा जनआंदोलन करणार असल्याची माहिती शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी माणगाव येथील पक्षाच्या बैठकीत बोलताना दिली.**




शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्मार्ट मीटरच्या विषयासंदर्भात आगामी काळात दक्षिण रायगडात काढण्यात येणाऱ्या जनआंदोलनाच्या नियोजनासाठी माणगाव तालुका शेकापचे सभा मंगळवारी (दि.६) ऑक्टोबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती माणगाव येथील सभागृहात शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील व पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी समाजकल्याण सभापती अशोक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

स्मार्ट मीटर विरोधात कोणताही लोकप्रतिनिधी आवाज उठवत नसून केवळ आपल्या सर्वांचे नेते जयंत पाटील यांनी आवाज उठविला आहे. त्यांना ताकद देण्यासाठी आपण सर्वांनी तसेच वीज बिलांमुळे त्रस्त असणाऱ्या सर्व नागरिकांनी एकत्र येणे गरजेचे आहे. दक्षिण रायगडात होणाऱ्या या स्मार्ट मीटर विरोधातील जनआंदोलनाला सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सरकारला आपली ताकद दाखवून द्यायची आहे.

यावेळी चित्रलेखा पाटील पुढे म्हणाल्या की, आपला पक्ष हा गोरगरीब सर्व सामान्य जनता व कष्टकरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी काम करीत आहेत. आपल्या पक्षाकडे आजच्या घडीला मनुष्यबळ कमी असले तरी पक्षातील निष्ठावंत व प्रामाणिक कार्यकर्ते आजही पक्षाशी एकनिष्ठ आहेत. माणगावमध्येही पक्षाचे कार्यकर्ते निष्ठेने पक्षाचे काम करत आहेत, याचा आनंद आहे. कमी कार्यकर्त्यातही पक्ष संघटना टिकवणे महत्वाचे असून मी पक्षातील कार्यकर्त्यांना लाल सलाम करते असे सांगून येत्या काळात दक्षिण रायगडमध्ये होणाऱ्या स्मार्ट मीटर विरोधातील जनआंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हा असे आवाहन त्यांनी केले.

- **शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांची माहिती**
- **भरमसाठ बिलांमुळे जनता मेटाकुटीला**

या बैठकीला ज्येष्ठ नेते नानासाहेब सावंत, भाऊसाहेब सावंत, राज्य कामगार आघाडीचे उपाध्यक्ष प्रदीप नाईक, जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, जिल्हा सरचिटणीस गौतम पाटील, महिला आघाडी अलिबाग तालुका अध्यक्षा नागेश्वरी हेमाडे, माणगाव तालुका चिटणीस सखाराम जाधव, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती महेश सुर्वे, ज्येष्ठ कार्यकर्ते हसनमिया बंदरकर, जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य राजेश कासारे, निजाम फोपळुणकर, चंद्रकांत सत्वे, रावसाहेब महाडिक, रामदास जाधव, युवा नेते स्वप्नील दसवते आदींसह तालुक्यातील पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार राजेश कासारे यांनी व्यक्त केले.

> सरकारच्या काळात महिला सुरक्षित नाहीत केवळ लाडकी बहीण योजनेचा गवगवा हे सरकार करीत आहे. स्मार्ट मीटरमुळे गोरगरीब जनता पुरती हैराण झाली आहे. भरमसाठ येणाऱ्या वीज बिलांमुळे गरीब कुटुंबांचा महिन्याचा खर्चाचा बजेट कोलमडत आहे.
>
> -चित्रलेखा पाटील
> शेकाप राज्य प्रवक्त्या

## नवरात्रोत्सवासाठी बाजारात कंदमुळांची रेचरेल

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

रविवारपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात होत असून, घराघरांत घटस्थापना करून देवीचा जागर सुरू होणार आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेलच्या भाजी बाजारातही लगबग वाढली असून, उपवासासाठी आवश्यक असलेल्या विविध भाज्या आणि कंदमुळांची आवक मोठ्या प्रमाणावर झाली आहे. नवरात्रातील नऊ दिवस अनेक भाविक उपवास करतात. त्यामुळे या काळात उपवासासाठी वापरल्या जाणाऱ्या रताळी, शेंगा आणि विविध कंदमुळांना विशेष मागणी असते. ही मागणी लक्षात घेऊन पनवेल भाजी मार्केटमध्ये विक्रेत्यांनी मोठ्या प्रमाणावर मालाची आवक करून ठेवली आहे.



सध्या बाजारात रताळी आणि विविध प्रकारची कंदमुळे ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. उपवासाच्या आहारात रताळ्याला विशेष महत्त्व असल्याने ग्राहकांकडून त्याची खरेदी मोठ्या प्रमाणावर केली जात आहे. त्याचबरोबर उपवासासाठी लागणाऱ्या इतर भाज्यांचीही मागणी वाढली आहे.

नवरात्र सुरू होण्यास काही दिवस शिल्लक असतानाच महिला वर्गाने उपवासाच्या साहित्याची खरेदी सुरू केली आहे. घरातील नवरात्राची तयारी, घटस्थापनेसाठी लागणारे साहित्य आणि उपवासासाठी आवश्यक असलेल्या खाद्यपदार्थांची खरेदी करण्यासाठी बाजारात नागरिकांची वर्दळ वाढताना दिसत आहे.नवरात्रोत्सवाच्या काळात केवळ धार्मिक वातावरणच नव्हे, तर बाजारपेठेतही उत्साहाचे वातावरण पाहायला मिळते. सकाळपासूनच भाजी बाजारात ग्राहकांची गर्दी होत असून, विक्रेतेही वाढत्या मागणीसाठी सज्ज झाले आहेत.

## कोतवाल भरती प्रक्रीया सुरु



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।**

अलिबाग तालुक्यामध्ये कोतवाल भरती प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे. यासाठी लागणारे अर्ज घेण्यासाठी उमेदवारांची तहसील कार्यालयात गर्दी होऊ लागली आहे. पाच दिवसात २५ हून अधिक उमेदवारी अर्ज घेण्यात आले आहेत. १७ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज कागदपत्रांसह दाखल करण्याची प्रक्रीया राहणार असल्याची माहिती निवड समितीचे सदस्य सचिव अर्थात तहसीलदार विक्रम पाटील यांच्याकडून उपलब्ध झाली आहे.

महसूल सेवक अर्थात कोतवालाच्या १९ जागांसाठी ही भरती होणार आहे. अनुसूचित जातीसाठी तीन, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती 'अ', भटक्या जमाती 'ड' या वर्गासाठी प्रत्येकी एक अशा तीन, भटक्या जमाती 'क', एसईबीसी, ईडब्लूएस वर्गासाठी प्रत्येकी दोन अशा सहा, आणि अराखीव (खुला) वर्गासाठी चार जागांचा समावेश आहे. यामध्ये सर्वसाधारणसाठी १३ आणि समांतर आरक्षण महिलांसाठी सहा जागांचा समावेश असणार आहे.

- **अर्ज घेण्यासाठी उमेदवारांची तहसील कार्यालयात गर्दी**

उमेदवार चौथी उतीर्ण असावा. त्याला मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. किमान १८ ते ४० वर्षे वय असावे, ही शैक्षणिक पात्रता व वयोमर्यादा आहे. या भरतीसाठी उमेदवारी अर्ज देण्याची सुरुवात दोन ऑक्टोबरपासून सुरु झाली आहे. अलिबागमधील तहसील कार्यालयात उमेदवारी अर्ज दिले जात आहेत. हे अर्ज भरल्यावर कागदपत्रांसह १७ ऑक्टोबरपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. कोतवाल अर्थात महसूल सेवक या पदासाठी उमेदवारी अर्ज घेण्यासाठी उमेदवारांनी तहसील कार्यालयात गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. कोतवाल भरतीसाठी १२ वी पासून पदवीधर उमेदवारांकडूनदेखील अर्ज भरण्यात आले आहेत. आतापर्यंत २५ हून अधिक अर्ज भरले असल्याची माहिती तहीसल कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

### स्कूटरचालकाचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

भरधाव स्कूटरवरील नियंत्रण सुटून रस्ता दुभाजकाला धडक झाल्याने गंभीर जखमी झालेल्या चालकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. महानतेश देवेंद्रप्पा बिदनूरकर (४३) असे मृत चालकाचे नाव असून ते आसुडगाव येथील निबेश्वर पिनेकल सोसायटीत राहत होते. महानतेश बिदनूरकर हे स्कूटरने रायन स्कूलसमोरील खांदा कॉलनी रोडने जात होते. त्यावेळी स्कूटरवरील नियंत्रण सुटल्याने भरधाव स्कूटर रस्ता दुभाजकाला धडकली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

## कमळाकर वाघमोडे यांचा सन्मान



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, कमळाकर वाघमोडे यांचा गुरुवारी (दि.१) अलिबागमध्ये सन्मान करण्यात आला. महाड तालुक्यातील देशमुख कांबळे येथील श्रीदत्त प्रासादिक भजन मंडळाच्या वतीने हा गौरव करण्यात आला.

कमळाकर वाघमोडे यांनी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अनेक वर्षे काम केले आहे. नुकतेच ते सेवानिवृत्त झाले. बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमाच्यावेळी श्रीदत्त प्रासादिक भजन मंडळाच्या वतीने वाघमोडे यांचा सत्कार करण्यात आला. भजनी बुवा सुजित देशमुख यांच्या हस्ते हा गौरव करण्यात आला. यावेळी बँकेचे वरिष्ठ अधिकारी भगत, देशमुख, पी. के. पाटील, आदी मान्यवरांसह बँकेतील अधिकारी व कर्मचारी तसेच भजनीप्रेमी उपस्थित होते. या सत्काराला उत्तर देताना कमळाकर वाघमोडे म्हणाले की, शब्दाला मान देऊन गेली अनेक वर्षापासून महाडमधून येऊन भजनी मंडळी भजनाचा कार्यक्रम करतात. भजनी मंडळाचे योगदान मोलाचे राहिले आहे.

## कमांडो-अतिरेक्यांच्या चकमकीचा थरार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बेथ एल प्रार्थनालयात सशस्त्र अतिरेकी घुसल्याचा संदेश मिळताच पनवेल पोलिसांसह सुरक्षा यंत्रणा तातडीने ॲक्शन मोडमध्ये आली. कमांडो आणि अतिरेक्यांमध्ये चकमक सुरू असल्याचे चित्र निर्माण झाल्याने परिसरात काही काळ थराराचे वातावरण निर्माण झाले. मात्र, ही प्रत्यक्ष घटना नसून सुरक्षा यंत्रणांकडून घेण्यात आलेली नियोजित मॉक ड्रिल असल्याचे स्पष्ट झाले. अतिरेकी घुसल्याची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिसराचा ताबा घेतला. संभाव्य दहशतवादी हल्ल्याच्या वेळी कोणत्या पद्धतीने कारवाई करावी, नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर कसे काढावे आणि संशयितांचा सामना कसा करावा, याचे प्रात्यक्षिक या रंगीत तालीमीत घेण्यात आले.

मॉक ड्रिलमध्ये पनवेल विभागाचे सहायक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ, बाळा कुंभार, श्वान पथक सहभागी झाले होते. मॉक ड्रिलदरम्यान निर्माण झालेल्या थरारक दृश्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ संभ्रम निर्माण झाला. मात्र, ही नियोजित सुरक्षा रंगीत तालीम असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

## उरणमध्ये ऑक्टोबर हिटचा तडाखा

**। उरण । प्रतिनिधी ।**

मोसमी पावसाने माघार घेताच उरणमध्ये ऑक्टोबरच्या सुरुवातीलाच उन्हाचा तडाखा वाढला आहे. सकाळपासूनच उकाडा आणि दमटपणा जाणवत असून, दुपारच्या कडक उन्हामुळे नागरिक हैराण झाले आहेत. थंडीची चाहूल लागण्याऐवजी उरणकरांना उन्हाच्या झळा सोसाव्या लागत असल्याने 'ऑक्टोबर हिट'ची चर्चा सुरू झाली आहे.

उरणमध्ये झपाट्याने वाढणारे कॉँक्रीटचे जंगल, डोंगरांचे सपाटीकरण, झाडे-झुडपांची होत असलेली कत्तल आणि मोकळ्या जागांचा कमी होत चाललेला परिसर यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. त्यातच रासायनिक उद्योग व विविध प्रकल्पांचा वाढता विस्तार यामुळे नैसर्गिक वातावरणावर ताण वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.




कॉँक्रीटच्या जंगलाने वाढवली उष्णता

पूर्वी हिरवाईने नटलेल्या उरणमध्ये आता सिमेंट-कॉँक्रीटच्या इमारतींची गर्दी वाढत आहे. डोंगर, झाडी आणि नैसर्गिक जलस्रोत कमी होत असताना जमिनीवर वाढणारे कॉँक्रीटचे आच्छादन उष्णता अधिक काळ साठवून ठेवत असल्याने स्थानिक तापमानावर त्याचा परिणाम होत असल्याची चिंता पर्यावरणप्रेमी व्यक्त करीत आहेत.

वाढत्या उकाड्याचा आरोग्यावरही परिणाम जाणवत असून, ताप, सर्दी, खोकला आणि अंगदुखीसारख्या तक्रारी घेऊन नागरिक दवाखान्यांकडे धाव घेत आहेत. मात्र या आजारांची नेमकी कारणे आणि त्यांचा वाढत्या तापमानाशी संबंध याबाबत अधिकृत वैद्यकीय आकडेवारी आवश्यक आहे. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दुपारच्या कडक उन्हापासून सावध राहावे, पुरेसे पाणी प्यावे आणि त्रास जाणवल्यास वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन केले जात आहे. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी डोंगर, झाडे-झुडपे, मोकळ्या जागा आणि नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण करण्याची गरजही व्यक्त होत आहे. हिरवाई तोडून कॉँक्रीटचे जंगल उभे केले, आता त्याच कॉँक्रीटची उष्णता उरणकरांच्या अंगावर येताना दिसत आहे.

**गेल्या चार दिवसात पनवेलमध्ये मोठी कारवाई | अतिक्रमण विभागाकडून दंडात्मक रक्कम वसूल**

# महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाचा बडगा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते आणि फुटपाथ मोकळे ठेवण्यासाठी पालिका प्रशासनाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार अतिक्रमण विरोधी मोहीम अधिक तीव्र केलीआहे. दरम्यान, गेल्या चार दिवसांपासून महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड' पनवेलच्या माध्यमातून अतिक्रमण विभागाने शहरातील अनधिकृत हातगाड्या, अनधिकृत फळे-भाजी विक्री व्यवसाय धारकांवर मोठी कारवाई करण्यात आली. १ ते ४ ऑक्टोबर २०२६ या चार दिवसांत करण्यात आलेल्या कारवाईत एकूण २ लाख ७ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.



**अनधिकृत खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई**

खारघर क्षेत्रातही अनधिकृतपणे चालणाऱ्या खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर पालिका पथकाने कारवाईचा बडगा उभारला. रस्त्याच्याकडेला आणि दुकानांच्या बाहेरील मोकळ्या जागेत अनधिकृतपणे साहित्य ठेवून अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांचे सामान जप्त करण्यात आले. व्यापाऱ्यांनी दुकानाची हद्द ओलांडून बाहेर ठेवलेले सामान अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ जप्त केले.

पालिकेच्या अतिक्रमण विभागातर्फे पनवेल, कळंबोली, खारघर, कामोठे नावडे या परिसरात विनापरवाना व अनधिकृतपणे थाटलेल्या दुकानांवर आणि फेरीवाल्यांवर धडक दंडात्मक कारवाई करण्यात आली. कळंबोली परिसरातील सेंट जोसेफ शाळेसमोर विद्यार्थ्यांची व पालकांची मोठी वर्दळ असते, फुटपाथवरील अतिक्रमणामुळे नागरिकांना रस्त्यावरून चालावे लागत होते. त्यामुळे फुटपाथवर अनधिकृतपणे थाटलेल्या स्टॉल्सवर पालिका कर्मचाऱ्यांनी थेट कारवाई केली. या मार्गावर तसेच, परिसरातील नर्सरी चालकांना प्रशासनाकडून अंतिम इशारा देण्यात आला असून त्यांनी विक्रीसाठी रस्त्यावर ठेवलेली झाडे तात्काळ हटवण्यात आली आहेत.

प्रभाग समिती मकफ कामोठे अंतर्गत दिनांक ०३ ऑक्टोबर २०२६ रोजी विशेष मोहीम राबवून अतिक्रमण हटवण्यात आले व मोठा दंड वसूल करण्यात आला. यामध्ये प्रभाग समिती मकफ मार्फत कामोठे परिसरात अतिक्रमण विभागाकडून करण्यात आलेल्या कारवाईत एकूण २८ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली.

नावडे परिसरात अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या हातगाड्या, अनधिकृत फळे व भाज्यां विक्री व्यवसाय धारकांवर दंडात्मक कारवाईच्या माध्यमातून शनिवारी १२ हजार इतका दंड वसूल करण्यात आला.

### कारच्या धडकेत मोटारसायकलस्वाराचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

भांडुप येथून पत्नीसह मोटारसायकलवरून दापोलीकडे जात असताना कारने धडक दिल्याने महेंद्र कारकर (४०) यांचा मृत्यू झाला. या अपघातात त्यांची पत्नी मृणाली कारकर (३८) गंभीर जखमी झाली असून, त्यांच्यावर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कारकर हे पत्नी मृणाली आणि मुलीसह भांडुप येथील कोकणनगर परिसरात राहत होते. ते मुंबईतील लीलावती रुग्णालयात वॉर्ड बॉय म्हणून कार्यरत होते. रविवारी पहाटे ते पत्नीसह मोटारसायकलवरून दापोलीकडे निघाले होते. पनवेलजवळ त्यांच्या मोटारसायकलला कारने धडक दिली. या अपघातात महेंद्र यांचा मृत्यू झाला.

# दडपता येणार नाही

राज्यात आणि देशात सध्या तरुण विद्यार्थी अस्वस्थ आहेत. यापूर्वी च्या दशकात इंदिरा गांधींच्या काँग्रेस राजवटीविरोधात तरुणांनीच पहिल्यांदा विरोधाचा एल्गार पुकारला होता. त्यातूनच पुढे जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन उभे राहिले. आज देशभरात हीच स्थिती आहे. केंद्रातील आणि राज्यातील सरकारांकडे तरुणांच्या प्रश्नावर एकच उत्तर आहे. लाठीमार किंवा धरपकड. राज्यात गेले सुमारे दोन महिने आदिवासी विद्यार्थी शाळा वाचवा हे आंदोलन करीत आहेत. सरकार त्याची दखल घेत नसल्याने ते पायी चालत मुंबईत आले. तर त्यांना मुंबई पोलिसांनी अत्यंत अमानुष अशी वागणूक दिली. या विद्यार्थ्यांपैकी एक गट रात्री थांबण्याला कोठेही आसरा नसल्याने महापालिका तसेच दादरमधील काँग्रेसच्या कार्यालयात थांबला होता. त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नव्हता व कायदाही मोडलेला नव्हता. आपल्या मागण्यांसाठी ते स्वतःच्या खर्चाने व स्वतःला कष्ट देत पायी चालत दोनशे किलोमीटरवरून आले होते. पण देवेंद्र फडणवीसांच्या पोलिसांना हे सहन झाले नाही. त्यांनी रातोरात या विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले व अनेक पोलिस ठाण्यांमध्ये फिरवून नंतर नाशिकच्या दिशेने सोडून दिले. ठाण्यातही अनेक ठिकाणी असाच प्रकार घडला. अनेक विद्यार्थ्यांना मारहाण करण्यात आली. तरुणांचा आवाज दडपण्याचा हा राक्षसी प्रकार आहे. ही मुले आदिवासी आहेत. मराठा वगैरेंसारख्या बलदंड जातीचे त्यांना पाठबळ नाही. मनोज जरांगे वगैरे नावाचा कोणी त्यांचा नेता नाही. त्यामुळे त्यांना कुत्र्यामांजरासारखी वागणूक दिली गेली. याचा धिक्कार करावा तितका कमी आहे. एरवी लव्ह जिहादसारख्या तद्दन खोट्या प्रश्नांवर भाजपवाले मोर्चे काढतात तेव्हा त्यांच्यासमोर पोलिस अगदी नरमाईने वागतात. अशा मोर्चांमध्ये एका समाजाविरुध्द विद्वेष पसरेल अशा घोषणा दिल्या जातात व भाषणे केली जातात. गेल्या आठवड्यात सोलापुरात मशिदीवरील भोंगे बंद करण्यासाठी असेच आंदोलन केले गेले. अशा सर्व प्रसंगी पोलिस व प्रशासन यांची वागणूक नरमाईची असते. काही ठिकाणी तर पोलिस या आंदोलकांचे नोकर असल्यासारखे वागतात. मात्र त्याच पोलिसांच्या लाठ्यांना समोर आदिवासी दिसले की मोठा चेव चढतो.

## लाठ्याकाठ्यांचा जबाब

आदिवासी आश्रमशाळांमध्ये साप चावून, कुपोषणाने किंवा अन्य कारणांनी शेकडो मुलांचा मृत्यू झाला आहे. त्यांना कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई दिली जात नाही. अधिकारी, मंत्र्यांवर कारवाई होत नाही. दुसरीकडे ग्रामीण भागात विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याचे कारण दाखवून आदिवासींच्या शाळा बंद केल्या जात आहेत वा दूरवर नेल्या जात आहेत. अशा दूरच्या शाळांमध्ये जाणे हे आदिवासी मुलांना परवडणारे नाही. पण सरकार नियम एके नियम धरून बसले आहे. याच्या विरोधात इतके दिवसांपासून आंदोलने चालू आहेत. विद्यार्थी उपोषण करीत आहेत. मध्यंतरी राहुल गांधी नाशिकला आले असता त्यांनीही या विद्यार्थ्यांची भेट घेऊन पाठिंबा दिला होता. पण सरकारला मात्र या तरुणांचे प्रश्न सोडवण्यास वेळ झाला नाही. उलट आता ते राजधानी मुंबईत आले असता त्यांनाच लाठ्याकाठ्यांनी दडपण्याचे किंवा तुरुंगाची भीती दाखवण्याचे उद्योग भाजपचे सरकार करीत आहे. याच काळात पुण्यात एमपीएससीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे धरणे आंदोलन सुरु आहे. मात्र आमदार रोहित पवार त्यांचे नेतृत्व करीत असल्याने त्यांना राजकीय फायदा मिळू नये म्हणून या आंदोलनाकडे सरकार बेदरकारपणे दुर्लक्ष करीत आहे. मध्यंतरी या विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यानंतर लोकसेवा आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली करण्यात आली. इतरही बदल करण्यात आले. म्हणजेच या आंदोलकांच्या मागण्यांमध्ये तथ्य आहे हे सरकारला मंजूर आहे. तरीही आता आयोगावर कारवाई करण्यास मात्र सरकार तयार नाही. याच लोकसेवा आयोगाने गेल्या काही दिवसात अनेक परीक्षा रद्द केल्या. फार्मसी परीक्षेच्या पेपरफुटीमुळे तिचा निकाल रद्द करावा लागला. त्या प्रकरणात आयोगाचेच कर्मचारी अडकलेले असल्याचे निष्पन्न झाले. याची जबाबदारी म्हणून आयोगाचे प्रमुख भीमनवार यांनी राजीनामा द्यावा वा त्यांना दूर करावे असे आंदोलकांचे म्हणणे आहे. मात्र सरकार याबाबत विद्यार्थ्यांचे समाधान करण्यात अपयशी ठरले आहे. आपला अभ्यास सोडून दिवसरात्र रस्त्यावर आंदोलन करण्याची त्यांच्यावर पाळी आली आहे.

## इव्हेंटबाजी बंद करा

तिकडे दिल्लीमध्येही निवडणूक आयोगाच्या विरोधातील लढ्यामध्ये विद्यार्थ्यांचाच पुढाकार आहे.वीस जुलैला कॉकरोच जनता पार्टीच्या संसदेवरील मोर्चादरम्यान दिल्ली पोलिसांनी राक्षसी दडपशाही केली. गणवेश नसलेले अनेक जण दांडके घेऊन हाणामारी करीत होते. मुलींना वाईट वागवण्यात आले. त्याविरुध्द देशात संताप निर्माण झाला व अखेर धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. पण केंद्र सरकार, अमित शहांचे दिल्ली पोलिस आणि प्रशासन यातून काहीच शिकलेले दिसत नाही. दोन ऑक्टोबरला जंतरमंतरवर आंदोलकांना येताच येऊ नये म्हणून हजारोंच्या संख्येने पोलिस उतरवण्यात आले. दिल्लीतील अनेक मेट्रो स्टेशन्स बंद करण्यात आली. त्यामुळे मग पुढचे चार दिवस आंदोलन चालू राहिले. नेहा बोरा हिच्यासारख्या तडफदार तरुणी व तरुण पोलिसांच्या विरोधात ठामपणे उभे राहत आहेत. पुन्हा पुन्हा आंदोलनासाठी येत आहेत. पोलिसांनी मुलींना अत्यंत वाईट कशी दिली याचे असंख्य रील्स आता सोशल मिडियातून प्रसृत झाले आहेत. त्याबाबत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास पोलिस तयार नाहीत. कारण मुळात आपण चुकीचे वागलो आहोत हेच त्यांना मान्य नाही. सरकारचाही अशा दडपशाहीला व हडेलहप्पीला पाठिंबाच आहे. यापूर्वी झारखंडमध्ये विद्यार्थ्यांनी लोकसेवा आयोगाविरुध्द आंदोलन केले तेव्हा तेथील सरकार काँग्रेस व झारखंड मुक्ती मोर्चाचे असल्याने भाजपचा आंदोलनाला पाठिंबा होता. पण दिल्लीत किंवा मुंबईत कोणत्याही विद्यार्थ्यांनी आंदोलने करता कामा नयेत अशी सरकारची भूमिका असते. कॉकरोच जनता पार्टी अर्थात सीजेपीला देशभरातील तरुण पोरांचा मिळणारा प्रतिसाद पाहून भाजपच्या नेत्यांची झोप उडाली आहे. त्यामुळे नरेंद्र मोदींपासून मोहन भागवतांपर्यत सगळे लोक जेन झी, जेन झी करू लागले आहेत. पण मुळात संवेदनशीलता नसल्याने त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास मात्र ते तयार नाही. जेन झींच्या नावाने काही इव्हेंट केले आणि मोदींनी इन्स्टाग्रामवर रील्स केले की लगेच तरुण मंडळींचा संताप दूर होईल अशी यांची हास्यास्पद समजूत आहे. तरुणांनी भाजपची लबाडी आता पुरेपूर ओळखली आहे. मुंबईत दोन ऑक्टोबरला आणि आता दिल्लीत रोज चालू असलेल्या आंदोलनांमधून ते दिसते आहे. मध्यंतरी मुंबईत साहिल वाकोडेच्या आत्महत्या प्रकरणी आयआयटी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. तेव्हाही प्रशासनाने त्यांच्याकडे दुर्लक्षाची भूमिका घेतली. हे दुर्लक्ष व त्यातून साचत जाणारा संताप यांचा एक दिवस स्फोट झाल्याखेरीज राहणार नाही. वर उल्लेख केलेल्या जयप्रकाशांच्या आंदोलनात हेच झाले. यापूर्वी शेतकऱ्यांनी दोन वर्षे दिल्लीत आंदोलन केले तेव्हा त्यांना राष्ट्रद्रोही ठरवून दडपण्याचा प्रयत्न झाला. तेच धोरण सरकार आताही अवलंबू पाहत आहे. मात्र आदिवासी असोत, एमपीएससीची तयारी करणारी मुले असोत किंवा सीजेपीमुळे एकत्र आलेली देशभरची तरुणाई असो, यांना आता दडपता येणार नाही.

**विचार**

# ‘ब्रिक्स’मधून बदलत्या विश्वव्यवस्थेचा नवा सूर

***भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ‘ब्रिक्स’ परिषदेने केवळ घोषणापत्राची औपचारिकता पूर्ण केली नाही, तर बदलत्या जागतिक व्यवस्थेत ‘ग्लोबल साऊथ’चा आवाज बुलंद करण्याचा प्रयत्न केला. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची फेररचना, स्थानिक चलनातील व्यापार, दहशतवादविरोधी सहकार्य आणि भारताची स्वतंत्र मुत्सद्देगिरी यामुळे दिल्ली परिषदेचे महत्त्व वाढले आहे.***

**भागा वरखडे**

जग एका अस्थिर वळणावर उभे आहे. पश्चिम आशियातील संघर्ष, रशिया-युक्रेन युद्ध, व्यापारयुद्ध, निर्बंधांचे राजकारण, पुरवठा साखळीतील व्यत्यय, तंत्रज्ञानावर मक्तेदारी आणि डॉलरकेंद्री जागतिक आर्थिक व्यवस्थेबाबत निर्माण झालेली अस्वस्थता या पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये झालेली अठरावी ‘ब्रिक्स’ परिषद केवळ आणखी एक आंतरराष्ट्रीय बैठक नव्हती. या परिषदेच्या माध्यमातून भारताने एकाच वेळी दोन संदेश दिले, ते म्हणजे भारत कोणत्याही एका गटाच्या छायेत नाही आणि ‘ग्लोबल साऊथ’च्या देशांना जागतिक निर्णयप्रक्रियेत अधिक प्रभावी स्थान मिळाले पाहिजे. भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेत स्वीकारण्यात आलेल्या ‘नवी दिल्ली घोषणापत्रा’ने बहुध्रुवीय आणि अधिक प्रतिनिधित्व असलेल्या जागतिक व्यवस्थेची गरज अधोरेखित केली. संघर्षांचे निराकरण संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या मार्गाने व्हावे, एकतर्फी निर्बंध आणि व्यापारातील अडथळ्यांचा वापर टाळावा तसेच जागतिक संस्थांमध्ये विकसनशील देशांना अधिक प्रतिनिधित्व मिळावे, अशी भूमिका ‘ब्रिक्स’ने मांडली.

यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची फेररचना. आजच्या जगाचे वास्तव आणि दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील सत्तासमीकरण यामध्ये मोठी दरी निर्माण झाली आहे. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेचे आर्थिक आणि राजकीय महत्त्व वाढले असताना संयुक्त राष्ट्रांच्या सर्वोच्च निर्णयप्रक्रियेत त्यांचे प्रतिनिधित्व त्या प्रमाणात वाढलेले नाही. ही विसंगती दूर करण्याचा आग्रह भारत सातत्याने धरत आला आहे. ‘ब्रिक्स’नेही सुरक्षा परिषदेच्या सुधारणेला पाठिंबा देत भारत आणि ब्राझीलला अधिक मोठी भूमिका मिळावी, अशी भूमिका नोंदवली आहे. या मागणीला संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनीही तत्त्वतः पाठिंबा दिला आहे. या आणि अशा विविध मुद्द्यांमुळे ही परिषद चांगलीच चर्चेत राहिली.

दिल्लीतील भेटीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गुटेरेस यांनी बहुध्रुवीयतेचे महत्त्व तसेच संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सुधारणेची गरज मान्य केली. गुटेरेस यांनी बहुपक्षीय संस्थांनी एकविसाव्या शतकातील वास्तव प्रतिबिंबित करावे, असे मत व्यक्त केले; मात्र येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घेतली पाहिजे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची फेररचना मागणे आणि प्रत्यक्षात ती होणे यात मोठे अंतर आहे. सुरक्षा परिषदेतील कायमस्वरूपी सदस्यांच्या हितसंबंधांमुळे सुधारणा प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची आहे. त्यामुळे ‘ब्रिक्स’च्या घोषणेला ऐतिहासिक राजनैतिक महत्त्व असले, तरी त्याचे तातडीने संस्थात्मक परिवर्तन होईल, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. या परिषदेतून भारताला मिळालेला दुसरा मोठा लाभ म्हणजे जागतिक मुत्सद्देगिरीच्या केंद्रस्थानी भारताचे स्थान अधिक मजबूत होणे. दिल्लीमध्ये चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान, इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फताह अल-सिसी, इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो, इथिओपियाचे पंतप्रधान अबी अहमद यांच्यासह विविध देशांचे नेते व प्रतिनिधी उपस्थित होते. ब्राझीलने परराष्ट्रमंत्र्यांच्या माध्यमातून सहभाग घेतला, तर सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीने वरिष्ठ प्रतिनिधी पाठवले. ब्रिक्स परिषदेमुळे दिल्ली काही दिवसांसाठी केवळ भारताची राजधानी राहिली नाही, तर ‘ग्लोबल साऊथ’च्या राजनैतिक संवादाचे केंद्र बनली. भारतासाठी ही संधी अत्यंत महत्त्वाची होती.

आज एकीकडे अमेरिका आणि युरोपशी भारताचे वाढते आर्थिक आणि तांत्रिक संबंध आहेत, तर दुसरीकडे रशिया, चीन, इराण आणि पश्चिम आशियातील देशांशी भारताचे ऐतिहासिक तसेच धोरणात्मक संबंध आहेत. या सर्वांशी एकाच वेळी संवाद साधण्याची क्षमता हीच भारताच्या ‘स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी’ची खरी परीक्षा आहे. मोदी यांनी परिषदेच्या निमित्ताने अनेक नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा केली. पुतीन यांच्याबरोबर संरक्षण, ऊर्जा, अंतराळ, व्यापार आणि कौशल्यविकासासह विविध क्षेत्रांमधील सहकार्याचा आढावा घेण्यात आला. पश्चिम आशियातील संघर्ष आणि त्याचा सागरी व्यापार तसेच भारतीय खलाशांच्या सुरक्षेवर होणारा परिणाम यावरही चर्चा झाली. जिनपिंग यांच्याशी झालेली चर्चा भारतासाठी विशेष महत्त्वाची ठरली. सीमावादामुळे गेल्या काही वर्षांमध्ये ताणले गेलेले संबंध सामान्य करण्याच्या दिशेने संवाद सुरू ठेवण्याचे संकेत दोन्ही बाजूंनी दिले. मतभेदांचे रूपांतर संघर्षात होऊ नये, ही भूमिका दोन्ही देशांसाठी आवश्यक आहे. कारण आशियातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांमधील तणावाचा परिणाम केवळ द्विपक्षीय संबंधांवर होत नाही, तर संपूर्ण आशियाई सुरक्षा व्यवस्थेवर होतो. पेझेश्कियान यांच्याशी झालेल्या चर्चेत पश्चिम आशियातील संघर्ष, सागरी वाहतुकीचे स्वातंत्र्य आणि व्यापारी मार्गांची सुरक्षितता या मुद्द्यांवर भर देण्यात आला. भारतासाठी हा विषय अत्यंत संवेदनशील आहे. कारण पश्चिम आशियातील अस्थिरता म्हणजे भारताच्या ऊर्जा सुरक्षेवरील धोका, व्यापारमार्गांवरील दबाव आणि परदेशात काम करणाऱ्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न.

संयुक्त अरब अमिरातीच्या अबुधाबीचे युवराज शेख खालिद बिन मोहम्मद यांच्याशी मोदी यांच्या चर्चेत संरक्षण, अंतराळ, अणुऊर्जा, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांसारख्या सामरिक क्षेत्रांमधील सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात आला. याच काळात ओडिशातील सुमारे ११.५ अब्ज डॉलरच्या एकात्मिक ॲल्युमिनियम प्रकल्पातील गुंतवणुकीचेही स्वागत करण्यात आले. मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्याशी झालेल्या चर्चेत संरक्षण आणि सुरक्षा, सेमीकंडक्टर, पायाभूत सुविधा, डिजिटल अर्थव्यवस्था, ऊर्जा आणि फिनटेक या क्षेत्रांमधील सहकार्याचा आढावा घेण्यात आला. भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने आग्नेय आशियाशी वाढणारे संबंध महत्त्वाचे आहेत. हिंदी महासागरापासून दक्षिण चीन समुद्रापर्यंतच्या सागरी क्षेत्रात भारताची भूमिका अधिक सक्रिय होत असताना या भागातील देशांशी संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य मजबूत करणे आवश्यक आहे. ‘ब्रिक्स’चा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आर्थिक स्वायत्तता. डॉलरला पर्याय म्हणून स्वतंत्र ‘ब्रिक्स’ चलन निर्माण करण्याबाबत गेल्या काही काळात मोठी चर्चा झाली; मात्र दिल्ली परिषदेत असा कोणताही औपचारिक ‘ब्रिक्स सामूहिक चलन’ प्रस्ताव स्वीकारला गेला नाही. भारताचा भर तातडीने नवे चलन निर्माण करण्यापेक्षा सदस्य देशांच्या स्थानिक चलनांमध्ये व्यापार आणि परस्पर देयकांची व्यवस्था मजबूत करण्यावर आहे. ही भूमिका अधिक व्यावहारिक आहे.

सामूहिक चलन निर्माण करणे म्हणजे केवळ नोटा छापणे नव्हे. त्यासाठी समान आर्थिक धोरण, चलनविषयक विश्वास, भांडवली हालचालींची सुसंगती, केंद्रीय बँकांमधील समन्वय आणि सदस्य देशांमध्ये दीर्घकालीन आर्थिक एकात्मता आवश्यक आहे. ‘ब्रिक्स’च्या सदस्यांची अर्थव्यवस्था, राजकीय व्यवस्था आणि आर्थिक धोरणे इतकी भिन्न आहेत की तातडीने एकच चलन स्वीकारणे व्यवहार्य नाही. त्याऐवजी स्थानिक चलनांमधील व्यापार, परस्पर पेमेंट प्रणाली आणि सीमापार व्यवहार अधिक सुलभ करणे हा योग्य मार्ग आहे. ‘ब्रिक्स’च्या घोषणेतही सीमापार पेमेंट यंत्रणांची आंतरकार्यक्षमता आणि स्थानिक चलनातील व्यापार-विनियोगाचा अभ्यास पुढे नेण्याचे नमूद करण्यात आले आहे. भारतासाठी याचा विशेष फायदा होऊ शकतो. रुपयात व्यापार वाढल्यास डॉलरवरील काही प्रमाणातील अवलंबित्व कमी होऊ शकते; मात्र डॉलरचे जागतिक महत्त्व एका परिषदेमुळे किंवा एका गटाच्या निर्णयामुळे संपणार नाही. त्यामुळे ‘ब्रिक्स’चा उद्देश ‘डॉलरविरोधी आघाडी’ करण्यापेक्षा बहुविध आर्थिक व्यवस्था उभी करणे हा असला पाहिजे. भारताने याच वास्तववादी भूमिकेचा आग्रह धरला आहे. सुरक्षा क्षेत्रातही ‘ब्रिक्स’ने दहशतवादाविरोधी सहकार्य, सागरी सुरक्षा, संघर्ष प्रतिबंध आणि शांतता प्रक्रियेला प्राधान्य दिले.

भारताने आपल्या अध्यक्षपदाच्या काळात संयुक्त ‘ब्रिक्स’ दहशतवादविरोधी कृती आराखड्याला पुढे नेले. ‘रिमोट सेन्सिंग’ उपग्रहांच्या माहितीची देवाणघेवाण, आपत्ती व्यवस्थापन, हवामान निरीक्षण, आरोग्य सुरक्षा आणि तंत्रज्ञान सहकार्य यांसारखे उपक्रमही भारताच्या दीर्घकालीन सुरक्षेला पूरक ठरू शकतात. येथे ‘सुरक्षा’चा अर्थ केवळ लष्करी सुरक्षा एवढाच मर्यादित राहिलेला नाही. अन्नसुरक्षा, ऊर्जा सुरक्षा, सायबर सुरक्षा, आरोग्य सुरक्षा, पुरवठा साखळीची सुरक्षा आणि समुद्री मार्गांची सुरक्षितता हेही आता राष्ट्रीय सुरक्षेचे भाग आहेत. ‘ब्रिक्स’च्या माध्यमातून भारताला या सर्व क्षेत्रांमध्ये सहकार्याचे नवे व्यासपीठ मिळत आहे. या परिषदेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ‘ब्रिक्स’मध्ये मतभेद असतानाही सहमती घडवून आणण्याची भारताची क्षमता. इराण आणि संयुक्त अरब अमिरातीसारख्या परस्परविरोधी भूराजकीय समीकरणातील देश एकाच व्यासपीठावर असताना संयुक्त घोषणापत्र स्वीकारणे सोपे नव्हते, तरीही भारताने सहमतीचा मार्ग शोधला. पश्चिम आशियातील संघर्षावर संयम, संवाद आणि राजनैतिक तोडगा यांचा आग्रह धरणे ही त्याचीच फलश्रुती आहे, तरीही ब्रिक्ससमोर अनेक प्रश्न आहेत. चीन आणि भारतातील स्पर्धा, रशिया-पश्चिम संघर्ष, इराणवरील दबाव, पश्चिम आशियातील तणाव आणि सदस्य देशांच्या वेगवेगळ्या आर्थिक हितसंबंधांमुळे ‘ब्रिक्स’ हा एकसंध राजकीय गट बनणे कठीण आहे. म्हणूनच ‘ब्रिक्स’ला ‘नाटो’प्रमाणे लष्करी आघाडी किंवा युरोपीय महासंघाप्रमाणे राजकीय-आर्थिक संघ बनवण्याऐवजी सहकार्याचे लवचिक व्यासपीठ म्हणून विकसित करणे भारतासाठी अधिक हिताचे आहे.

**चर्चा आजची**

# उत्सवांचे बाजारीकरण थांबणे गरजेचे



**वैभव पाटील**

सण-उत्सव हे आपल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. परंपरेने चालत आलेले या उत्सवाचे स्वरूप आजच्या घडीला बदलले असले तरी पूर्णतः ते संपुष्टात आलेले नाही. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते संक्रमित होत आलेले आहे. आणि आपणही हे सण-उत्सव तितक्याच आनंद व उत्साहाने साजरे करतो. पूर्वापार चालत आलेल्या या उत्सवांनी मानवी जीवनाला संजीवनी देण्याचे काम केलेले आहे. मानवी नाते-संबंध, आपुलकी, जिव्हाळा, कृतज्ञता, संवेदनशीलता यांना खतपाणी घालण्याचे काम सण-उत्सव करीत आले आहे.

सध्या सण, उत्सवाचे दिवस चालु झाले आहेत. उत्सव हल्ली मोठ्या धडाक्यात साजरे केले जातात. जसजसा माणूस उत्क्रांत होत गेला, समाजव्यवस्थेत बदल होत गेले तसतसे सण, समारंभ, उत्सव साजरे करण्याच्या व आनंद व्यक्त करण्याच्या पद्धतीत बदल होत गेले. ढोलताशे, डीजे, लेझर, रोषणाई, झगमगाट, फटाक्यांची आतिषबाजी, नाचगाण्यांचा दणदणाट, प्रचंड मिरवणुका, देखावे आणि बक्षीसांची खैरात. या सगळ्या उत्सवी गोंगाटात सणांचे बाजारीकरण झाले असून रोजगार, महागाई, भ्रष्टाचार या सर्व घटना दबल्या गेल्या आहेत.

सण-उत्सव हे आपल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक आहेत. परंपरेने चालत आलेल्या उत्सवाचे स्वरूप आजच्या घडीला बदलले असले तरी पूर्णतः ते संपुष्टात आलेले नाही. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते संक्रमित होत आलेले आहेत. आणि आपणही हे सण-उत्सव तितक्याच आनंद व उत्साहाने साजरे करतो. पूर्वापार चालत आलेल्या या उत्सवांनी मानवी जीवनाला संजीवनी देण्याचे काम केलेले आहे. मानवी नाते-संबंध, आपुलकी, जिव्हाळा, कृतज्ञता, संवेदनशीलता यांना खतपाणी घालण्याचे काम सण-उत्सव करीत आले आहे. शारीरिक, मानसिक, वैचारिक, बौद्धिक या घटकांचे पोषण करणारे असे होते. मनोरंजनाचा व करमणुकीचा भाग जरी त्यात असला तरी आचार-विचारांनी उत्तम पिढ्या घडवण्याचे कार्य हे उत्सव करीत असत. समाजात जे-जे चांगले आहे ते सगळ्यांपर्यंत पोहोचवणे आणि समाजातील वाईट आणि चुकीचे जे आहे त्यावर बोट ठेवून निषेध करणे म्हणजे एकप्रकारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य या उत्सवांनी केले आहे.

प्रत्येक उत्सवामागे समता, बंधुता हि जीवनमुल्य दडलेली आहेत. तुम्ही जर शोधली तर ती तुम्हाला सापडतील. परंतु आपण मात्र, आजच्या घडीला त्याला केवळ करमणुकीचे साधन म्हणून पाहत आहोत आणि इच्छांची पोळी त्यावर भाजत आहोत. आधीच्या उत्सवाचे संस्कार वातावरण जाऊन त्याची जागा चंगळवादी वृत्ती आणि प्रदूषणाने घेतली. ध्वनी प्रदूषण, जल प्रदूषण फार मोठ्या प्रमाणात होऊ लागले. त्यातून आरोग्याला धोका पोहोचू लागला. वाट्टेल तसे भले मोठे मंडप घालणे, लायटिंग करणे, मोठ्या आवाजात लाऊड स्पीकर लावणे हे तर नित्याचेच होऊन बसले आहे. खरे तर देव असे म्हणत नाही की, असा अवाजवी खर्च करून आमचे स्वागत करा; पण लोकांनी देवालाही सुद्धा स्पर्धेत उतरवले आहेत. कुठल्या मंडळाची सजावट चांगली त्याला क्रमांक दिला जातो. पण असे करून देव थोडाच प्रसन्न होणार आहे. त्याला तर मनोभावे केलेला नमस्कारही पोहोचतो. खोट्या दिखाव्याची त्याला आवश्यकता नाही. म्हणजे इथे सुद्धा मानवाने आपल्या इच्छा, अपेक्षा त्याच्यावर लादल्या पण कायम देवाकडे काही मागण्यापेक्षा आपल्याला दाता ही होता आले पाहिजे. समजाला, नव्या घडणाऱ्या पिढीला आपल्याकडून जितके म्हणून काही चांगले देता येईल, असे आपण वागले पाहिजे. ज्ञानात, बुद्धीत भर पाडणाऱ्या संस्कारक्षम स्पर्धा आपण आयोजित केल्या पाहिजेत. त्यांच्यात दडलेल्या सुप्त गुणांना वाव मिळेल. आणि हसत-खेळत आनंदी वातावरणाची निर्मिती करून अगदी सहजरित्या आपण त्यांना बोधामृत देऊ शकू, असे काहीतरी करायला हवे. आजची एकंदरीत सामाजिक स्थिती पाहता ती बदलण्यासाठी व त्याच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी खरे तर उत्सवांचे आयोजन असते. हीच त्यामागील प्रमुख भूमिका व उद्दिष्ट होय. परंतु, निरर्थक असे वेळ वाया घालवणाऱ्या कर्यक्रमांचे प्रस्थ हल्ली खूप वाढल्याचे आपल्याला दिसून येईल. आजची एकंदरीत सामाजिक स्थिती पाहता ती बदलण्यासाठी व त्याच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी खरे तर उत्सवांचे आयोजन असते. हीच त्यामागील प्रमुख भूमिका व उद्दिष्ट होय. परंतु निरर्थक असे वेळ वाया घालवणाऱ्या कर्यक्रमांचे प्रस्थ हल्ली खूप वाढल्याचे आपल्याला दिसून येईल. घरगुती अगदी साध्या पद्धतीने साजरे केले जाणाऱ्या उत्सवांना आपण उगाच मोठे स्वरूप दिले. परंतु दिखाव्याने उद्दिष्ट साध्य होत नाही. त्याकरिता कृतीला विचारांची जोड हवी. अजूनही वेळ गेलेली नाही आपण जर ठरवले तर आपली उत्सवांची ही संस्कृती जपू शकू व तिचे संवर्धन करू शकू.

**लोकसंसद**

## तीन शास्त्रज्ञांना नोबेल पुरस्कार जाहीर!

वैद्यकशास्त्रातील २०२६ चा प्रतिष्ठेचा सर्वोच्च नोबेल पुरस्कार अमेरिकेचे ५४ वर्षीय कार्ल डायसेरोथ (स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी) आणि जर्मनीचे ७१ वर्षीय पीटर हेगेमन (हम्बोल्ट युनिव्हर्सिटी ऑफ बर्लिन) तसेच ७३ वर्षीय जॉर्ज नागेल (युनिव्हर्सिटी ऑफ वुर्झबर्ग) या तीन शास्त्रज्ञांना संयुक्तपणे जाहीर झाला आहे. या अनुषंगाने स्वीडनच्या स्टॉकहोम येथील कॅरोलिन्स्का इन्स्टिट्यूटमध्ये या पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली. ‘ऑप्टोजेनेटिक्स’ या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रकाशाच्या मदतीने मेंदूच्या चेतापेशींवर नियंत्रण मिळवता येते, या संशोधनासाठी या तीन शास्त्रज्ञांना नोबेल पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. ‘ऑप्टोजेनेटिक्स’ हे जैविक संशोधनातील एक अत्याधुनिक तंत्रज्ञान असून यामध्ये प्रकाश (ऑप्टिक्स) आणि जनुकीय अभियांत्रिकी (जेनेटिक्स) यांच्या मिलाफातून जिवंत प्राण्यांच्या मेंदूतील विशिष्ट पेशींवर नियंत्रण ठेवता येऊ शकते हे या तीन शास्त्रज्ञांनी शोधून काढले. मानवी मेंदू हा अत्यंत गुंतागुंतीचा मानला जातो. या क्रांतिकारी शोधामुळे मानवातील अल्झायमर्स, पार्किन्सन्स, तीव्र नैराश्य आणि अंधत्व यांसारख्या गंभीर मेंदूविकारांवर भविष्यात अचूक उपचार करणे शक्य होणार आहे. या बहुमोल संशोधनामुळे आजवर मेंदूच्या ज्या आजारांवर केवळ औषधांचे तात्पुरते उपचार शक्य होते, तेथे आता थेट चेतापेशींचा अचूक अभ्यास करून योग्य उपचार करण्याचे मार्ग मोकळे झाले आहेत. नोबेल पुरस्कार विजेत्या तिन्ही शास्त्रज्ञांचे अभिनंदन!

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

**दिनविशेष**

# आधुनिक मराठी कवितेचे जनक कवी केशवसुत

मराठी साहित्याच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की, त्यांनी केवळ साहित्यनिर्मिती केली नाही, तर आपल्या लेखणीच्या सामर्थ्याने एका नव्या युगाची सुरुवात केली. आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणून ज्यांचे नाव आदराने घेतले जाते, ते म्हणजे कवी केशवसुत. त्यांचे मूळ नाव कृष्णाजी केशव दामले. अल्पायुष्यात त्यांनी केलेली काव्यनिर्मिती संख्येने मर्यादित असली, तरी तिचा प्रभाव मात्र मराठी साहित्यावर अत्यंत व्यापक आणि दीर्घकाळ टिकणारा ठरला. केशवसुतांचा जन्म ७ ऑक्टोबर १८६६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड येथे झाला. त्या काळातील सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती परंपरांनी बांधलेली होती. समाजात अनेक रूढी, अंधश्रद्धा आणि विषमता होती. अशा वातावरणात केशवसुतांच्या कवितेने नव्या विचारांचा, स्वातंत्र्याचा, समतेचा आणि परिवर्तनाचा आवाज बुलंद केला. त्यामुळेच ते केवळ कवी राहिले नाहीत, तर मराठी समाजाच्या वैचारिक परिवर्तनाचे अग्रदूत ठरले. सामान्य माणूस, समाजातील विषमता, स्वातंत्र्याची आकांक्षा, निसर्ग, मानवी स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तन या विषयांना त्यांनी कवितेत स्थान दिले. त्यांच्या कवितेत कल्पनाशक्ती, लय आणि विचार यांचा सुंदर मिलाफ आढळतो. केशवसुतांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे त्यांनी कवितेला समाजाशी जोडले. कवीने केवळ निसर्गाचे वर्णन किंवा प्रेमभावना व्यक्त न करता आपल्या काळातील प्रश्नांवर भाष्य केले पाहिजे, ही भूमिका त्यांनी आपल्या लेखनातून वेळोवेळी दाखवून दिली आहे. समाजातील विषमता, अज्ञान आणि जुनाट विचारसरणी यांना त्यांनी आव्हान दिले. त्यामुळे त्यांच्या कवितेत मानवमुक्तीची आकांक्षा दिसून येते. त्यांचा आधुनिकतावाद हा केवळ पाश्चात्त्य प्रभावातून आलेला नव्हता; तो भारतीय समाजातील वास्तव समजून घेण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झाला होता. आज आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात जगत असलो, तरी सामाजिक प्रश्न संपलेले नाहीत. डिजिटल युगात माहिती प्रचंड वाढली आहे; पण विवेक वाढला आहे का, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. सोशल मीडिया, अफवा, आणि सामाजिक विषमता यांसारख्या समस्यांसमोर केशवसुतांचा विवेकवादी आणि परिवर्तनवादी दृष्टिकोन आजही मार्गदर्शक ठरतो. केशवसुतांचे महत्त्व केवळ त्यांच्या कवितांच्या संख्येत नाही, तर त्यांनी मराठी कवितेला दिलेल्या नव्या दिशेत आहे. त्यांच्या पश्चात आलेल्या अनेक कवींना त्यांच्या विचारांचा आणि काव्यशैलीचा प्रभाव जाणवला. आधुनिक मराठी कवितेच्या प्रवाहाला त्यांनी जी सुरुवात करून दिली, ती पुढे विविध कवींनी समृद्ध केली. कवी केशवसुतांचे आयुष्य अल्प होते; परंतु त्यांची काव्यदृष्टी दीर्घायुषी ठरली. त्यांनी आपल्या कवितेतून समाजाला जागे केले, नव्या विचारांचे स्वागत करण्याचे धैर्य दिले आणि परिवर्तनाची आस निर्माण केली. आज त्यांच्या स्मृतीकडे पाहताना केवळ एका महान कवी म्हणून स्मरण करणे पुरेसे नाही. त्यांच्या कवितेतील प्रश्न, विचार आणि परिवर्तनाची हाक आपण आपल्या जीवनात किती स्वीकारतो, हे अधिक महत्त्वाचे आहे. केशवसुतांची कविता म्हणजे मराठी मनाला मिळालेली आधुनिकतेची पहाट आहे. त्यांच्या लेखणीने मराठी कवितेला नवा आत्मा दिला आणि समाजाला विचार करण्याची नवी दृष्टी दिली. म्हणूनच कवी केशवसुत हे केवळ आधुनिक मराठी कवितेचे जनक नव्हेत, तर विचारजागृतीचे आणि सामाजिक परिवर्तनाचे शाश्वत कवी आहेत. केशवसुतांचे निधन ७ नोव्हेंबर १९०५ रोजी झाले. मृत्युपश्चात त्यांच्या कवितेबद्दल गुणग्राहक व प्रशंसापर अनेक लेख लिहिले गेले. अनेक कविताकारांनी त्यांना गुरुस्थानी ठेवले. त्यांना आधुनिक काव्याचे जनक मानले गेले. त्यांच्या काव्यापासून प्रेरणा घेऊन पुढील काळात ‘आधुनिक मराठी काव्यात’ कितीतरी परिवर्तने व प्रयोग झाले. महाराष्ट्राच्या काव्य परंपरेत ‘केशवसुत’ हे नाव आता अजरामर आहे. महाराष्ट्र शासनातर्फे १९६६ मध्ये केशवसुतांची जन्मशताब्दी साजरी करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली व या समितीकडून केशवसुतांच्या काव्यसंग्रहाच्या हस्तलिखिताची यथामूल आवृत्ती १९६७ मध्ये प्रकाशित केली गेली. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या प्रयत्नातून केशवसुतांच्या जन्मगावी मालगुंड येथे स्मारक उभारण्यात आले व या स्मारकाचे उद्घाटन ८ मे १९९४ रोजी झाले.

**– जगन घाणेकर**

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028
१९३७-२०२६ ९० वर्ष
www.krushival.in
बुधवार, दि. ७ ऑक्टोबर, २०२६


# कोलाड सर्व्हिस रोडची दुरवस्था

## ■ रस्त्यावर खडीचे साम्राज्य; प्रवाशांचा जीव मुठीत धरून प्रवास



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कोलाड बाजारपेठेतील सर्व्हिस रोडवर मोठया प्रमाणात खडी पसरली आहे. या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. विशेषत: या खडीवरून दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे या सर्व्हिस रोडची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून करण्यात येत आहे.

कोलाड बाजारपेठेतील दोन्ही बाजूच्या सर्व्हिस रोडची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. या मार्गावरून असंख्य नागरिकांची ये-जा सुरु असते. मात्र या रस्त्यावर मोठया प्रमाणात खडी पसरली आहे. त्यामुळे यातून मार्ग काढताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर रस्त्यावर पसरलेली खडी ही या मार्गाने एखादे वाहन गेले तर वाहनाच्या टायर खालून खडी ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या अंगावर उडत आहे. यामुळे नागरिक जखमी होत असून प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. याशिवाय रस्त्याला मोठंमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यातून प्रवास करणे प्रवाशांसह वाहनचालकांना त्रासदायक ठरत आहे. तरी संबंधित विभागाने या मार्गाची दुरुस्ती चांगल्या प्रकारे आणि लवकरात लवकर करावी, अशी मागणी केली जात आहे.

### निकृष्ट दर्जाच्या कामामुळे नागरिक त्रस्त

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम गेली १८ वर्षांपासून सुरु असून अद्याप हे काम पूर्ण झालेले नाही. ज्या ठिकाणचे काम पूर्ण झाले आहे, तेही निकृष्ट दर्जाचे असल्याचे समोर येत आहे. या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे अपघातात असंख्य प्रवाश्यांचा नाहक बळी गेला आहे. तर असंख्य प्रवासी जखमी झाले आहेत. याला जबाबदार कोण? अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवासी नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

### तातडीने काम पूर्ण करण्याची मागणी

जवळजवळ पावसाळा संपायला आला असून रस्त्याच्या दुरुस्तीची कामे करण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. त्यामुळे संबंधित विभागाने केवळ तात्पुरती डागडुजी कामे न करता कोलाड बाजारपेठेतील दोन्ही सर्व्हिस रोडची कामे दर्जेदार पद्धतीने तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी वाहनचालकांसहित प्रवासी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

७ ऑक्टोबर

१) श्री.मदन विठ्ठल माळी
मु.थळपेठ, अलिबाग
दि.७-१०-१९४२

२)श्रीम.शैलजा शशिकांत म्हात्रे
मु.थळ, अलिबाग
दि.७-१०-१९५६

३)श्रीम.केतकी केशव टिळू
मु.थळ, अलिबाग
दि.७-१०-१९६१

४)श्री.विजय आनंद महाजन
चेंढरे, अलिबाग
दि.७-१०-१९४७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते

**विश्वनाथ (विलास) निगळ्ये, ठाणे**



**कै. लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग**

**सौ संध्या महेंद्र पाटील, वाढदिवस अलिबाग**

**सचिन जोशी, वाढदिवस अलिबाग**



**स्व. परेश नवीनचंद्र गाला, ५ वी पुण्यतिथी, सांताक्रूझ मुंबई**

## मतदार नोंदणी, जनजागृती कार्यक्रम



**चिरनेर :** शासन आपल्या दारी निमित्ताने वीर वाजेकर महाविद्यालयात सोमवारी (दि.५) मतदार नोंदणी व मतदार जनजागृती हा उपक्रम तहसीलदार उरण यांच्या मार्फत घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना लोकशाही बळकट करण्यासाठी मतदार नोंदणी व योग्य उमेदवार निवडून देण्यासाठी जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी नव मतदार होणाऱ्या विद्यार्थांनी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले. नायब तहसीलदार प्रभाकर नवाले यांनी मतदार जागृती व मतदार नोंदणी विषयी तपशीलवार माहिती दिली. १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी करावी, त्यासाठी फॉर्म कसा भरावा, त्यासाठी जोडावी लागणारी कागदपत्रे, भरावयाची माहिती दिली. विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी फॉर्मचे वाटपही करण्यात आले.

## मुरुड येथे शांतता समितीची बैठक

### ■ नवरात्रोत्सव शांततेत पार पाडण्याचे आवाहन

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरुड पोलीस ठाणेतर्फे आगामी नवरात्रोत्सव सणाच्या पार्श्वभूमीवर येथील दर्यासारंग सभागृहात तालुक्यांतील नवरात्रौत्सव मंडळ पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील व शांतता समिती सदस्य आदींची बैठक मुरूड ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली.



प्रास्ताविक करताना मुरुड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक परशुराम कांबळे यांनी मार्गदर्शन केले. नवरात्रोत्सव मंडळे मुरुड तालुक्यात ६३ असून सर्व पदाधिकाऱ्यांनी देवी प्रतिष्ठापनेपासून विसर्जनादरम्यान सतर्क राहून अनुचित प्रकार होऊ नये. जेणेकरून उत्सवाला गालबोट लागणार नाही, यासाठी युवक मंडळांनी योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. ध्वनी प्रदुषणामुळे वयोवृद्ध तसेच बालकांना आवाजाचा त्रास होऊ नये, याची काळजी घ्यावी. कायद्याचे उल्लंघन होऊ नये. तसेच, नवरात्रौत्सवात चलतचित्र वा देखावे सादर करताना कोणाच्याही भावना दुखावणार नाहीत, सायबर सुरक्षा, कायद्याविषयी जनजागृती व्हावी, यासाठी समाज प्रबोधनाचे विषय निवडण्याचे आवाहन कांबळे यांनी केले.

## श्रमदानातून वनराई बंधारा साकार

**। बोर्ली पंचतन । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री समृद्ध ग्राम अभियान योजनेंतर्गत सोमवारी (दि.५) श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन ग्रामपंचायत हद्दीतील कोंढे पंचतन येथे श्रमदानातून वनराई बंधारा उभारण्यात आला. ग्रामपंचायत अधिकारी शंकर मयेकर, पोलीस पाटील उद्देश वागजे, शाखाप्रमुख शंकर गाणेकर, स्थानिक ग्रामस्थ, तरुण वर्ग आणि महिलांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.



कोंढे पंचतन ग्रामस्थांनी एकत्र येत श्रमदानातून नदीपात्रातील रेती पोत्यांमध्ये भरली. या पोत्यांची रचना करून पाणी अडविण्यात आले आणि वनराई बंधारा साकारण्यात आला. या बंधाऱ्यामुळे गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीतील पाणीसाठा वाढण्यास तसेच परिसरातील भूजल पातळी वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे हिवाळा आणि उन्हाळ्यात भेडसावणारी पाणीटंचाई कमी करण्यासाठीही हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

पावसाचा प्रत्येक थेंब अडवून त्याचा भविष्यात उपयोग करण्याच्या दृष्टीने कोंढे पंचतन ग्रामस्थांनी श्रमदानातून वनराई बंधारा साकारत जलसंधारणाचा आदर्श निर्माण केला आहे.

शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर गावातील उपलब्ध जलस्रोत टिकवून ठेवणे आणि पाण्याची गरज भागविण्यासाठी आतापासून नियोजन करणे आवश्यक आहे.

## २१ दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीत २१ दिवसांच्या गणपती बाप्पांच्या विसर्जन सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला. पोलीस हद्दीत यंदा तब्बल ४५ गणपती बाप्पांच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले, अशी माहिती मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस मकरंद पाटील यांनी दिली.


(छाया: गणेश चोडणेकर)

विसर्जन मिरवणुकीत भक्तांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. कुठे ताल, मृदुंग आणि चिपळीच्या गजरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले, तर काही ठिकाणी डीजेच्या वाद्यावर महिला भक्तगणांनी ठेका धरत आनंद व्यक्त केला. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. नवसाला पावलेल्या बाप्पाला निरोप देताना भाविकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि भक्तिभावाचे वातावरण पाहायला मिळाले. विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्याकडून आवश्यक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## एसटी बसचा अपघात

**रत्नागिरी :** मंडणगड-वेळास मार्गावरील मालेगाव येथील धोकादायक वळणावर मंगळवारी (दि.६) सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास एसटी बसचा भीषण अपघात झाला. धोकादायक वळणावर समोरून अचानक येणाऱ्या वाहनाची संभाव्य धडक टाळण्यासाठी बसचालकाने तातडीने ब्रेक दाबले. मात्र, त्यामुळे बसवरील ताबा सुटला आणि बस रस्त्यालगतच्या एका कंपाउंडच्या भिंतीवर जोरदार आदळली. अपघाताच्या वेळी बसमध्ये एकूण १२ प्रवासी प्रवास करत होते. या अपघातात तीन प्रवाशांना दुखापत झाली. अपघातानंतर स्थानिकांच्या मदतीने जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## २४ गावांमध्ये स्वच्छता अभियान उपक्रम

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

रिलायन्स फाउंडेशन व रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानांतर्गत २८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत परिसरातील ९ ग्रामपंचायतींमधील २४ गावांमध्ये व्यापक स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला.




या अभियानांतर्गत ग्रामस्तरावरील स्वच्छता सुविधा, सार्वजनिक परिसर आणि समुदाय स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आला. अभियानादरम्यान १४० जिल्हा परिषद शाळा व समुदाय शौचालयांची सखोल स्वच्छता करण्यात आली. तसेच ८,३४६ चौ. मीटर क्षेत्रात गवत कापणी व परिसर स्वच्छता करण्यात आली.

गावांमधील सार्वजनिक स्वच्छता अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने १.३ किलोमीटर लांबीचे समुदाय नाले व गटारे सखोल स्वच्छ करून सुरळीत करण्यात आले. याशिवाय १० ठिकाणांहून सुमारे ३६ टन साचलेल्या समुदाय कचऱ्याची उचल करून योग्य विल्हेवाट लावण्यात आली. अभियानाच्या अंतिम टप्प्यात २४ गावांमध्ये रिलायन्सच्या वेगवेगळ्या विभागामधून कर्मचारी स्वयंसेवकांच्या सहभागातून विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान ५३० किलो कचरा संकलित करण्यात आला. यासोबतच नागरिकांमध्ये स्वच्छता, सार्वजनिक परिसराची निगा आणि कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमामुळे गावांमधील स्वच्छता सुविधांमध्ये सुधारणा करण्यासोबतच सार्वजनिक आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेबाबत जनजागृतीला चालना मिळाली. कर्मचारी स्वयंसेवक आणि ग्रामस्थांच्या सहभागातून ग्रामस्तरावरील लोकसहभाग अधिक बळकट करण्यासही मदत झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रिलायन्स इंडस्ट्रीज नागोठण्याचे प्रेसिडेंट शशांक गोयल, कॉर्पोरेट अफेयर्स डिपार्टमेंटचे अनिल डांगी, रमेश धनावडे, विविध विभागामधील इंजिनियर्स, सफाई कर्मचारी, एसएचजी ग्रुप असे जवळपास ४०० कर्मचारी कार्यरत होते.

**रिलायन्स फाउंडेशन व रिलायन्स इंडस्ट्रीजचा पुढाकार**

**डॉ. श्रीया शेट्येंची संशोधन अनुदानासाठी निवड | तारकांच्या उत्क्रांतीचा करणार अभ्यास**

## युरोपच्या विज्ञानविश्वात कोकण कन्येची भरारी

**। मुंबई/युरोप । प्रतिनिधी ।**

वैज्ञानिक संशोधनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या भारतीय वंशाच्या डॉ. श्रीया शेट्ये यांची युरोपियन रिसर्च कौन्सिलच्या २०२६ ईआरसी स्टार्टिंग ग्रँट प्रारंभिक संशोधन कार्यासाठी देण्यात येणाऱ्या या प्रतिष्ठित अनुदानासाठी निवड झाली आहे. त्यांच्या MERLIN या महत्त्वाकांक्षी संशोधन प्रकल्पासाठी हे अनुदान मंजूर झाले आहे. या यशामुळे डॉ. श्रीया शेट्ये यांनी भारतीय, मराठी आणि विशेष म्हणजे रायगडकर अलिबागकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

डॉ. श्रीया शेट्ये या सध्या बेल्जियममधील युनिव्हर्सिटी लिब्र द ब्रुसेल्स आणि केयू ल्यूवेन येथील खगोलशास्त्र संशोधनाशी संबंधित आहेत. त्यांच्या MERLIN प्रकल्पाचे यजमान संस्थान ULB आहे. विशेष म्हणजे, या प्रकल्पासाठी संशोधन करणाऱ्या त्या भारतीय वंशाच्या एकमेव महिला संशोधक आहेत.



अलिबागच्या प्रसिद्ध राजा चूना मालक सुशिल हरिश्चंद्र शेट्ये आणि सायली सुशिल शेट्ये यांची ती कन्या आहे.

MERLIN प्रकल्पातून प्रौढ अवस्थेकडे वाटचाल करणाऱ्या तारकांच्या अंतर्गत भागातील चुंबकीय क्षेत्रांचा त्यांच्या उत्क्रांतीवर तसेच रासायनिक संरचनेवर होणारा परिणाम अभ्यासला जाणार आहे. डॉ. श्रीया या प्रकल्पांतर्गत वैयक्तिक तारकांच्या सखोल निरीक्षणांसोबतच मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणाऱ्या स्पेक्ट्रोस्कोपिक सर्वेक्षणातील माहितीचा वापर करणार आहेत. या संशोधनातून तारकांच्या अंतर्गत प्रक्रियांबरोबरच जड मूलद्रव्यांची निर्मिती आणि पुढील पिढीतील तारे व ग्रहांच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या पदार्थांच्या उत्क्रांतीविषयी नवी माहिती मिळण्याची अपेक्षा आहे.

डॉ. श्रीया शेट्येच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे आई-वडील सुशिल हरिश्चंद्र शेट्ये आणि सायली सुशिल शेट्ये, तसेच संपूर्ण शेट्ये कुटुंबीयांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे. श्रीयाने आपल्या वैज्ञानिक कर्तृत्वातून युरोपच्या भूमीवर भारतीय आणि मराठी समाजाचा गौरव वाढविला आहे. त्यांना पुढील संशोधनासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

### भारतीय वंशाच्या तीन वैज्ञानिकांना ईआरसी स्टार्टिंग ग्रँट

२०२६ मध्ये ईआरसी स्टार्टिंग ग्रँट मिळविणाऱ्या भारतीय वंशाच्या संशोधकांमध्ये डॉ. श्रीया शेट्ये, डॉ. कौस्तुभ हकीम आणि डॉ. पार्थ चानसोरिया यांचा समावेश आहे. डॉ. कौस्तुभ हकीम यांचा 'एक्सोजिओकेम'एक्सोजिओकेम' प्रकल्प अतिउच्च दाबाचे प्रयोग आणि संगणकीय प्रारूपांच्या साहाय्याने सूर्यमालेबाहेरील 'उप-नेपच्यून' ग्रहांच्या अंतरंगाचा अभ्यास करणार आहे. ते बेल्जियमच्या रॉयल ऑब्झर्व्हेटरी आणि केयू ल्यूवेन येथे संशोधक म्हणून कार्यरत आहेत. तर डॉ. पार्थ चानसोरिया यांचा 'इकोप्रिंट' प्रकल्प अल्ट्रासाऊंडच्या मदतीने मानवी शरीरातील ऊतींच्या पुनर्निर्मितीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दिशेने काम करणार आहे.

# निवडक



## सेंट्रल स्कूलला स्मार्ट टीव्ही भेट

**सोगाव :** मुरुड तालुक्यातील बोर्ली-मांडला येथील रा.जि.प. सेंट्रल स्कूलला शनिवारी (दि.३) सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल माध्यमातून अधिक प्रभावी व गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्यास मदत होणार आहे. हा स्मार्ट टीव्ही दर्शना नाईक यांच्या सौजन्याने शाळेला भेट देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसाठी सुरेश साळुंखे यांच्या आर्थिक सहकार्याने खाऊचे वाटप करण्यात आले. त्यांच्या या समाजाभिमुख योगदानाबद्दल सक्षम एज्युकेशन सोसायटीने मन:पूर्वक आभार व्यक्त केले. या कार्यक्रमावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचे महत्त्व सांगत अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध होत असल्याचे मत व्यक्त केले. शाळेच्या वतीने सक्षम एज्युकेशन सोसायटी तसेच देणगीदारांचे आभार मानण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण, पर्यावरण, क्रीडा व विद्यार्थी विकासासाठी भविष्यातही असे विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, असा निर्धार सक्षम एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.



## पनवेलमध्ये पोलिसांचे मॉक ड्रिल

**खांदेश्वर :** पनवेल शहरातील टपाल नाका येथील बेथ एल सिनेगॉगमध्ये सोमवारी (दि.५) सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांकडून मॉक ड्रिल घेण्यात आली. सकाळी ११.४६ ते दुपारी १.१३ या कालावधीत ही रंगीत तालीम घेण्यात आली. आपत्कालीन परिस्थितीत विविध यंत्रणांनी कशा पद्धतीने तातडीने प्रतिसाद द्यावा, याचा सराव यावेळी करण्यात आला. यामध्ये पनवेल विभागाचे सहायक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाण्यातील चार अधिकारी व १५ अंमलदार, तसेच बीट मार्शल १, २ आणि ३ वरील अंमलदार सहभागी झाले होते. याशिवाय क्यूआरटी पथकातील दोन अधिकारी व २१ अंमलदार, बॉम्ब शोधक व नाशक पथकाचे चार अंमलदार श्वानपथकासह, सुरक्षा शाखेचे तीन अंमलदार आणि विशेष शाखेतील एका अंमलदाराने सहभाग घेतला. अग्निशमन दलाचे एक अधिकारी व सहा कर्मचारी तसेच रुग्णवाहिकाही यावेळी उपस्थित होती. दरम्यान, बेथ एल सिनेगॉग प्रशासन तसेच सिनेगॉगच्या सुरक्षेसाठी नियुक्त नवी मुंबई पोलीस मुख्यालयातील सुरक्षा कर्मचाऱ्यांना सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सूचना आणि मार्गदर्शन करण्यात आले.

## चणेरा विभागात जिओचे नेटवर्क गायब

**■ ग्राहकांचा संताप, संपर्क यंत्रणा ठप्प**

**चणेरा :** चणेरा विभागातील विविध गावांमध्ये जिओ कंपनीचे मोबाईल नेटवर्क गेल्या दोन दिवसांपासून अचानक गायब झाल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. मोबाईल कॉल, इंटरनेट तसेच ऑनलाइन व्यवहारांसाठी जिओवर अवलंबून असलेल्या ग्राहकांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून अनेक भागात जिओचे नेटवर्क अत्यंत कमी किंवा पूर्णपणे बंद असल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून करण्यात येत आहेत. नेटवर्क उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना फोन करणे तसेच इंटरनेटचा वापर करणे शक्य होत नसल्याचे सांगण्यात येत आहे. विशेषतः विद्यार्थी, ऑनलाइन काम करणारे नागरिक, व्यावसायिक, दुकानदार आणि डिजिटल पेमेंटवर अवलंबून असलेल्या ग्राहकांना याचा मोठा फटका बसत आहे. ऑनलाइन व्यवहार करताना अडथळे येत असल्याने काही ठिकाणी ग्राहक व व्यापाऱ्यांची गैरसोय होत आहे. दरम्यान, नेटवर्कच्या समस्येबाबत संबंधित कंपनीने तातडीने दखल घेऊन तांत्रिक बिघाड शोधून सेवा सुरळीत करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## डी.बी.जगत्पुरिया यांना पुरस्कार जाहीर



**अलिबाग :** विख्यात कवी, समीक्षक आणि ज्येष्ठ पत्रकार डी. बी. जगत्पुरिया यांना जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ, नागपूर तर्फे दिला जाणारा अत्यंत मानाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय प्रज्ञा पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. इंडोनेशियातील बाली येथे येत्या १९ आणि २० नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या जागतिक साहित्य संमेलनात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या संमेलनासाठी त्यांना मुख्य अतिथी म्हणूनही निमंत्रित करण्यात आले आहे. या दुहेरी बहुमानाबद्दल साहित्यिक आणि पत्रकारिता क्षेत्रातून डी. बी. जगत्पुरिया यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांनी हा सन्मान अत्यंत नम्रपणे आपले आप्तस्वकीय, मित्र परिवार आणि चाहत्यांना अर्पण केला आहे. डी. बी. जगत्पुरिया यांचे साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान आहे. त्यांच्या नावावर मराठी व हिंदी कवितासंग्रह, ५ समीक्षा ग्रंथ, सामाजिक-वैचारिक ग्रंथ, व्यक्तिचित्रे, नाटक आणि एकांकिका अशी सुमारे ३० ते ३२ पुस्तके प्रसिद्ध आहेत. याशिवाय, ३५वे अस्मितादर्श साहित्य संमेलन, अंकुर साहित्य संमेलन आणि इतर अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले आहे. त्यांना यापूर्वी अनेक राज्यस्तरीय आणि ७ राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

## चिल्हे विद्यालयात आरोग्य तपासणी

**कोलाड :** लायन्स क्लब कोलाड आणि आय.के.एस.केअर फाऊंडेशन यांच्या वतीने रोहा तालुक्यातील श्रमिक विद्यालय चिल्हे येथे सोमवारी (दि.५) विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य आणि हिमोग्लोबीन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. लायन्स क्लबचे डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन (बाल विकास आणि महिला सक्षमीकरण) एम जे एफ लायन विवेक सुभेकर यांच्या विशेष सहकार्यातून आणि मार्गदर्शनाखाली हे शिबीर पार पडले. या शिबिरादरम्यान तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाकडून २०० हून अधिक विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांची उंची, वजन, सर्वसाधारण आरोग्य आणि विशेषतः शरीरातील रक्ताचे (हिमोग्लोबीन) प्रमाण तपासण्यात आले. तपासणीअंती ज्या विद्यार्थ्यांमध्ये रक्ताची कमतरता किंवा इतर किरकोळ आजार आढळून आले, अशा ६० विद्यार्थ्यांना लायन्स क्लबच्या वतीने मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. तसेच त्यांना आरोग्याविषयी आणि योग्य आहाराविषयी ला. विवेक सुभेकर, ला. डॉ श्याम लोखंडे, ला. रविंद्र लोखंडे यांच्याकडून मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देणाऱ्या या उपक्रमाचे शिक्षक आणि उपस्थित मान्यवरांसह सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## निवडक



### विद्यार्थ्यांची पुणे येथे औद्योगिक भेट

**नागोठणे :** भारतीय एज्युकेशन सोशल चॅरिटेबल ट्रस्टफ शेठ श्री ओटरमल शेषमल परमार कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजिनिअरिंग नागोठणे यांच्या संगणक अभियांत्रिकी व एआयएमएल अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी ४ ऑक्टोबर रोजी प्रो अ‍ॅझुर सॉफ्टवेअर सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड व राजावी टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, पुणे येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवेश यादव यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात आलेल्या या भेटीच्या समन्वयक प्रा. विश्रांती पेढवी व प्रा. साहिल शिंदे होते. या उपक्रमास विभाग प्रमुख प्रा. सागर सुरेकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी पुष्कर शिंदे व एआयएमएल विभागातील विद्यार्थी भाग्येश नाखवा यांनीही औद्योगिक भेटीच्या नियोजन व समन्वयामध्ये सक्रिय सहभाग घेतला. औद्योगिक भेटीदरम्यान एच आर एक्झिक्यूटिव्ह मिस नाझिया पठाण यांनी विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स अँड ऑटोमेशन, क्लाऊड कंपाऊंटिंग, सर्व्हर मॅनेजमेंट, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग आणि डाटा सायन्स या आधुनिक तंत्रज्ञानांची तसेच त्यांचा उद्योगक्षेत्रातील उपयोग याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना टेक्निकल वर्कशॉप, इंटर्नशिप ऑपॉर्च्युनिटीज, इंडस्ट्री स्किल्स आणि आयटी क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत देखील माहिती देण्यात आली.



### माथेरानचे जंगल प्लास्टिक कचरामुक्त करण्यासाठी पालकमंत्र्यांना साकडे

**कर्जत :** माथेरानमध्ये येणारे पर्यटक जंगलात पर्यटन करीत असताना प्लास्टिक कचरा जंगलात फेकला जातो. तोच प्लास्टिक कचरा उचलण्यासाठी मनुष्यबळ काम करीत असून यावर कायम स्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी करणारे पत्र पर्यावरणप्रेमी यांच्याकडून रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांना देण्यात आले आहे. माथेरानमध्ये पर्यावरणप्रेमी तरुण म्हणून राकेश कोकळे यांना ओळखले जाते. गेली अनेक वर्षे माथेरानचे पर्यावरण आणि जंगल प्लास्टिकमुक्त करण्यासाठी सातत्याने काम करत आहे. माथेरानच्या जंगलातून आतापर्यंत मोठ्या प्रमाणात प्लास्टिक आणि प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करून नगरपरिषदेच्या ताब्यात देण्याचे कार्य करीत असतात.हे अनेक वर्षे सुरू असून वर्षातून किमान तीन ते चार वेळा राकेश कोकळे यांना ही मोहीम राबवावी लागते.माथेरानला प्लास्टिकमुक्त करण्यासाठी काही ठोस उपाययोजना आणि कायम स्वरूपी कृती आराखडा राबविण्याबाबत रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांना पत्र दिले आहे.गेली अनेक वर्षे माथेरानच्या पर्यावरणासाठी प्रामाणिकपणे काम करणारे राकेश कोकळे यांनी माथेरानला प्लास्टिकमुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्याचे विनंती केली आहे. माथेरान शहरात निर्माण झालेली ही समस्या कायमस्वरूपी मार्गी लागावी यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम राबवण्याची मागणी देखील राकेश कोकळे यांनी केली आहे.

### अलिबाग येथे अमृतपेठ थेट स्वदेशी बाजारपेठ उपक्रम संपन्न

**रायगड :** महाराष्ट्र संशोधन, उन्नती प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या संस्थेचा अमृत पेठ थेट स्वदेशी बाजारपेठ उपक्रम रायगड जिल्ह्यातील अलिबाग शहरातील हॉटेल व्हेज बॅंक्वेट हॉल, टिळक रोड अलिबाग येथे यशस्वीरित्या संपन्न झाला. महाराष्ट्र शासनाची अमृत ही स्वायत्त संस्था असून तिच्यामार्फत इतर मागासवर्गीय बहुजन विकास कल्याणांतर्गत आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध व्यवसायोत्तेजक प्रशिक्षण वर्ग घेतले जातात व नव्यानं तयार होणाऱ्या लघु उद्योजकांच्या वस्तूंना विशेष प्रदर्शनासाठी चांगला मंच मिळावा आणि त्यांच्या मालाचा भरपूर खप होण्यासाठी चांगल्या बाजारपेठा मिळाव्यात जगात सर्वत्र त्यांचे उद्योगव्यवसाय पोहोचावेत हा अमृतपेठचा मूळ उद्देश आहे. तसेच शासनाच्या अनेक योजनांचा तसेच अनेक प्रशिक्षणाचा त्यांना कसा लाभ घेत येईल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे: रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन २ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (३ जागा), ओरिएंटल कुक १ जागा, इंडियन चायनीज कुक १ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा WhatsApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- **Vacancy for Store Manager in furniture Store** Experience in Sales - 5+ years, Salary - 40,000 per Mouth, Location Zirad. Contact - 9823585321
- **Vacancy in Furniture Factory as a office boy/girl,** Education - Graduation, Experience 3-4 years,Salary 20,000 per month, Location : Bamansure, Chondli. Contact - 9823585321.
- **पाहिजे :** सकाळी दहा ते बारा आणि फुलटाईम घरकामासाठी बाई संपर्क : ८५३०३०९७६५
- **नोकरीची सुवर्ण संधी :-**इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर ऑफिस मध्ये Tally आणि एक्सेलच्या कामामध्ये अनुभव असलेले २ अनुभवी accountant पाहिजे. मुलगी/मुलगा. ज्यांना Tally चे आणि Excel चे ज्ञान व अनुभव आहे, त्यांनी या संधीचा नक्की लाभ घ्यावा. इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. संपर्क - +९१ ८२३७२८८२४१/+९१ ८१८००६८७७४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# यंदा संकलित मूल्यमापन चाचणी लांबणीवर!

## दिवाळीनंतरचा मुहूर्त; विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण न देण्याच्या सूचना

**। रायगड । प्रतिनिधी ।**

२०२६-२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी संकलित मूल्यमापन चाचणी-१ नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात येणार आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांनी याबाबत जिल्हास्तरीय यंत्रणांना सूचना दिल्या आहेत. या चाचणीत प्रथम भाषा, गणित आणि तृतीय भाषा इंग्रजी या तीन विषयांचा समावेश आहे.



विद्यार्थ्यांनी इयत्तानिहाय अपेक्षित अध्ययन संपादणूक कितपत साध्य केली आहे, याची पडताळणी करणे हा चाचणीचा प्रमुख उद्देश आहे. त्याआधारे विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी शिक्षकांना मदत होणार आहे. संकलित मूल्यमापन चाचणी ही इयत्ता दहावी किंवा बारावीच्या बोर्ड परीक्षेप्रमाणे नसल्याने विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण देऊ नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील उणिवा शोधून त्यावर कृती कार्यक्रम राबविणे, तसेच अध्ययन निष्पत्तीमध्ये सुधारणा घडवून आणणे, हा या चाचणीचा मुख्य हेतू आहे. दुसरी ते आठवीपर्यंत गुणांची रचना प्रथम भाषा, गणित आणि इंग्रजी या तिन्ही विषयांची चाचणी सर्व माध्यमांतील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येईल. इयत्ता दुसरीसाठी लेखी व तोंडी परीक्षेसाठी ३० गुण, तिसरी-चौथीसाठी ४० गुण, पाचवी-सहावीसाठी ५० गुण आणि सातवी-आठवीसाठी ६० गुण असतील. इयत्तेनुसार परीक्षेचा कालावधी ६० ते १२० मिनिटांचा राहणार आहे.

शाळांना त्यांच्या सकाळ किंवा दुपारच्या सत्रानुसार वेळेचे नियोजन करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. मात्र तोंडी परीक्षा संबंधित दिवशी लेखी परीक्षेनंतर वैयक्तिक स्वरूपात घेण्याच्या सूचना आहेत. विद्यार्थ्यांची संख्या अधिक असल्यास उपलब्ध वेळेनुसार ती पुढील दिवशी घेता येणार आहे.

**प्रश्नपत्रिकांची गोपनियता**

काटेकोर चाचणीच्या प्रश्नपत्रिका अंदाजे २५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत वितरित करण्यात येणार आहेत. तालुकास्तरावर प्रश्नपत्रिका प्राप्त झाल्यानंतर त्या सुरक्षित व स्वतंत्र खोलीत ठेवण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहणार आहे. प्रश्नपत्रिकांचे फोटो काढणे किंवा समाजमाध्यमांवर प्रसारित करणे यासारखे गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**गुणांवरून शिक्षकांवर कारवाई नाही**

विशेष म्हणजे, या चाचणीत विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांच्या आधारे कोणत्याही शिक्षकावर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार नसल्याचे शासनाच्या सूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे. चाचणीचे गुण विद्यार्थ्यांच्या अध्ययनविषयक गरजा ओळखून प्रभावी उपाययोजना करण्यासाठी वापरण्यात येणार आहेत.

# निधी फाऊंडेशनतर्फे वडके विद्यालयात शैक्षणिक मार्गदर्शन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या विविध संधी, योग्य मार्गदर्शन आणि व्यावहारिक ज्ञान मिळावे, या उद्देशाने निधी फाउंडेशनच्या वतीने आज एस. एम. वाडके पब्लिक स्कूल, अलिबाग येथे इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शन व प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



ग्रामीण विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक मार्गदर्शन आणि विविध संधी पोहोचविण्याच्या उद्देशाने या संस्थांनी निधी फाऊंडेशनच्या उपक्रमाला सहकार्य केले.

विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण न देता त्यांच्या भविष्यातील करिअरच्या संधी, गणितातील कौशल्य आणि विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून समजाव्यात, या उद्देशाने कार्यक्रमात तीन विशेष सत्रांचे आयोजन करण्यात आले.

पहिल्या सत्रात करिअर मार्गदर्शन पारंपरिक क्षेत्रांपलीकडील संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये दहावीनंतर शाखा निवड, बारावीनंतरचे विविध शैक्षणिक व व्यावसायिक पर्याय तसेच वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रांव्यतिरिक्त आरोग्यसेवा, विज्ञान, तंत्रज्ञान आणि उदयोन्मुख क्षेत्रांतील विविध संधींची माहिती देण्यात आली.

दुसऱ्या सत्रात जलद गणित अधिक वेगाने गणना करण्याच्या पद्धती या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बेरीज, वजाबाकी, गुणाकार यांसह मनोगणिताच्या सोप्या पद्धती आणि जलद गणना करण्याच्या विविध युक्त्या विद्यार्थ्यांना कृतीद्वारे शिकविण्यात आल्या.

तिसऱ्या सत्रात लघु विज्ञान प्रयोग प्रयोगातून विज्ञानाचे शिक्षण या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विज्ञानातील मूलभूत संकल्पनांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. आम्ल, आम्लारी, क्षार, आयन, लिटमस चाचणी आणि निर्देशक यांसारख्या संकल्पना साध्या, सुरक्षित आणि मनोरंजक प्रयोगांद्वारे समजावून सांगण्यात आल्या.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग राहावा, त्यांच्या मनातील प्रश्नांना योग्य दिशा मिळावी आणि भविष्यातील शैक्षणिक संधींबाबत त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण व्हावी, यावर विशेष भर देण्यात आला.

# स्व.अण्णासाहेब पाटील यांना प्रशासनाचे अभिवादन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्याचे कार्य करणारे क्रांतिसूर्य स्व.अण्णासाहेब पाटील यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त रायगड येथील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकत मार्गदर्शन केंद्र, रायगड या कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अण्णासाहेब पाटील यांच्या सामाजिक व आर्थिक चळवळीतील योगदानाचे स्मरण करण्यात आले. महामंडळाच्या विविध योजना, त्यांची अंमलबजावणी व लाभार्थ्यांना उपलब्ध होणाऱ्या अर्थसहाय्याबाबत माहिती देण्यात आली. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत पात्र लाभार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून पुढे उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबी करण्यावर भर देण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे प्र.सहायक आयुक्त श्रीकांत कोकाटे, संकेत मोरे, अंजली पाटील व इतर कर्मचारी-अधिकारी उपस्थित होते.

# डिझेल माफियांचा सागरी पट्ट्यावर कब्जा?

**। उरण । प्रतिनिधी ।**

सागरी किनारपट्टीवर महत्त्वाची बंदरे आणि औद्योगिक प्रकल्प असताना दुसरीकडे कथित डिझेल तस्करीचा काळाबाजार फोफावत असल्याच्या चर्चेने खळबळ उडाली आहे.

बोटी, टँकर आणि समुद्रमार्गे मोठ्या प्रमाणात डिझेल-बायोडिझेलची कथित वाहतूक होत असल्याचे आरोप वारंवार होत असतानाही या कथित रॅकेटच्या मुळावर घाव का घातला जात नाही, असा सवाल आता उरणकर विचारू लागले आहेत.या कथित व्यवहाराच्या संदर्भात काही नावे स्थानिक पातळीवर चर्चेत असल्याचे बोलले जात आहे. मात्र, त्यांच्या विरोधातील आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे या नावांची चौकशी करण्याचे धाडस प्रशासन दाखवणार की नाही, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. या कथित डिझेल तस्करीबाबत वारंवार विचारणा होऊनही उरण परिसरातील संबंधित पोलीस ठाण्यांकडून नेमकी किती प्रकरणे दाखल झाली, किती डिझेल जप्त झाले आणि या व्यवहाराच्या मुख्य सूत्रधारांपर्यंत तपास पोहोचला का, याबाबत स्पष्ट माहिती जनतेसमोर येत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

# रायगडला पूर्णवेळ जिल्हा माहिती अधिकारी मिळावा

**ज्येष्ठ पत्रकार जयपाल पाटील यांची मागणी**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगडचे जिल्हा माहिती अधिकारी हे पद जुन२०२३ पासून रिक्त असून ते तातडीने भरावे यासाठी ज्येष्ठ पत्रकार तथा ज्येष्ठ पत्रकार असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष प्राध्या. डॉ. जयपाल पाटील यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

रायगड जिल्ह्यात अनेक दैनिक व साप्ताहिक असून वृत्तपत्रात येणाऱ्या जिल्ह्याच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रशासन व जनतेसाठी जिल्ह्याला जिल्हा माहिती अधिकारी असणे गरजेचे आहे आणि तो प्रशासन व जनतेत मधील दुवा आहे. रायगड जिल्ह्यातील महाराष्ट्र शासनात दोन कॅबिनेट मंत्री असल्यामुळे अनेक महिला व्यक्ती जिल्ह्याच्या भेटीस येतात त्यांची अधिकृत योग्य माहिती ते देऊ शकतात जिल्ह्यात सध्या अधिकृत ६४ पत्रकार असून त्यांना जिल्हा माहिती कार्यालयात अधिकृत माहिती अधिकारी नसल्याने फार अडचण निर्माण होते. रायगड जिल्ह्याची जबाबदारी ठाणे येथील जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांच्याकडे दिलेली आहे.

मनोज सानप जिल्हा माहिती अधिकारी असताना त्यांनी शासनाकडे पिंपळभाट येथे अद्यावत पत्रकार भवन बांधण्याचा प्रस्ताव सादर केला होता, तो सध्या शासनाकडे धूळखात पडलेला आहे, रायगड जिल्ह्यातून पत्रकार जिल्हा माहिती कार्यालयात भेटीस आल्यावर त्या कार्यालयात स्वच्छतागृहाची ही व्यवस्था नाही.

विशेष म्हणजे जिल्हा कार्यालयात दोन महिलाही कर्मचारी आहेत, हे कार्यालय अलिबागमध्ये भाड्याच्या जागेत असताना तेथून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात आणले तेथे स्वच्छतागृह बांधताना शेजारी असलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी त्याच्यावर आक्षेप घेतला. त्यामुळे येथे येणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांना स्वच्छतागृहाची शोध मोहीम घ्यावी लागते, मात्र हेच कार्यालय पिंपळभाट येथे अद्यावत झाल्यास अनेक ज्येष्ठ पत्रकारांची गैरसोय टळेल.

जिल्हा माहिती कार्यालय अधिकाऱ्यास स्वतःचे वाहन मिळावे म्हणून अलिबागच्या सर्व पत्रकारांनी खासदार, आमदार व मंत्री महोदयांकडे आवाज उठविल्यानंतर वाहन आले मात्र त्यामध्ये बसण्यात जिल्हा माहिती अधिकारी नाही, अशी सध्याची स्थिती आहे.

याच कार्यालयासाठी जिल्हा माहिती अधिकारी मुख्य तथा सहाय्यक माहिती अधिकारी ही एक जागा असून ते कोकण भवन येथील माहिती कार्यालयात कार्यरत आहेत, असा रायगड जिल्हा माहिती कार्यालयाचा कार्यभार सुरू आहे.

# गतिरोधकासाठी बेमुदत उपोषणाचा इशारा

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

रस्त्यावर भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे अपघाताची शक्यता लक्षात घेऊन नगरपरिषदेला अर्ज विनंत्या करून मुरुडच्या गणेशआळी ते सुपारी संघ दरम्यान बसविण्यात आलेला गतिरोधक काढण्यात आला. काढण्यात आलेला गतिरोधक तातडीने बसविण्यात न आल्यास नगर परिषदेसमोर बेमुदत उपोषणाला बसणार असल्याचा इशारा सागर चौलकर यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.



**नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना दिले निवेदन**

गणेश आळी ते सुपारी संघ दरम्यान रस्त्यावर बसविण्यात आलेला गतीरोधक बसविण्यात यावा, यासाठी २१ सप्टेंबर रोजी अर्ज सादर केला असून मागील दोन वर्षांपूर्वी देखील गतिरोधक बसविण्याबाबत अर्ज केलेला होता. मात्र अर्जाचा विचार प्रशासनाकडून झालाच नाही. परंतु मागील काही दिवसांपासुन मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीमध्ये नगरपरिषदेमार्फत प्रत्येक प्रभागामध्ये गतिरोधक बसविण्यात आले. यामध्ये काही ठिकाणी लोकप्रतिनिधींनी गतिरोधक बसवून घेतलेले आहेत. मात्र गणेशआळीमध्ये लोकप्रतिनिधींनी याबाबत लक्ष दिले नाही.

यामुळे मुरुड नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष यांच्यासोबत चर्चा करुन गतिरोधक बसवून घेतलेला होता. परंतु बसविण्यात आलेला गतिरोधक लोकप्रतिनिधींनी काढून टाकण्यास मुरुड नगरपरिषदेला कळविले आणि तो काढून टाकला आहे, असा आरोप सागर चौलकर यांनी केला आहे.

येत्या दोन दिवसांमध्ये मागणीप्रमाणे गणेशआळी येथे गतिरोधक बसवून न मिळाल्यास १६ ऑक्टोबर दुपारी १२.०० वाजल्यापासुन नगर परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसण्या वाचून कोणता पर्याय राहाणार नाही, असा इशारा सागर चौलकर यांनी दिला आहे.

# सेवा संकल्प अभियान अंतर्गत राबवले विविध उपक्रम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सेवा संकल्प अभियानांतर्गत नेरे ग्रामपंचायत हद्दीत विविध उपक्रम राबवण्यात आले. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत सेवा संकल्प अभियान ठिकठिकाणी राबवण्यात येत आहे.

या सेवा संकल्प अभियानांतर्गत नेरे ग्रामपंचायत हद्दीत विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले तसेच परिसरात वृक्ष लागवड करून आरोग्य शिबीर राबवण्यात आले. चित्रकला स्पर्धा आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन यावेळी करण्यात आले होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, पंचायत समिती सदस्य वर्षा केवारे, सरपंच प्रकाश घाडगे, उपसरपंच शैलेश जाधव, ग्रामसेविका राजश्री पाटील यांच्यासह ग्रामपंचायतचे सदस्य, ग्रामस्थ, महिला, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

**जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे आवाहन**

**महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानाचा शुभारंभ**

# प्रलंबित प्रकरणे सामोपचाराने निकाली काढा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

वर्षानुवर्षे महसूल विभागाकडे प्रलंबित असलेली छोटी-मोठी प्रकरणामध्ये किरकोळ कारणांमुळे वाद वाढवत नेल्यास पक्षकारांचा वेळ, पैसा आणि ऊर्जा खर्च होते. पक्षकारांनी महसूल लोक अदालतीच्या माध्यमातून परस्पर सामोपचाराने, संवादातून आणि सलोख्याच्या भूमिकेतून ही प्रकरणे निकाली काढावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयात महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानाचा शुभारंभ जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी सचिन ढोले, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.अनंत पाटील (प्रभारी), ॲड. मच्छिंद म्हात्रे आणि मोठ्या संख्येने पक्षकार उपस्थित होते.

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले, महसूल प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्यामुळे संबंधित कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा मोठा वेळ त्यामध्ये खर्च होतो. वारंवार न्यायालयात किंवा कार्यालयात जाणे, वकिलांशी संपर्क साधणे आणि त्यासाठी होणारा खर्च याचा परिणाम कुटुंबाच्या दैनंदिन जीवनावरही होतो. कुटुंबाच्या प्रगतीसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी, शेती व उत्पादनक्षम कामांसाठी किंवा व्यवसायासाठी वापरता येणारी ऊर्जा आणि वेळ वादामध्ये खर्च होतो. त्यामुळे पक्षकारांनी आपापसांतील मतभेद सामोपचाराने सोडवून पुढील पिढ्यांपर्यंत वादाचे ओझे जाऊ नये, यासाठी प्रयत्न करावेत. परस्परांमध्ये सलोखा निर्माण करून प्रकरण कायम स्वरूपी संपविल्यास कुटुंबातील वातावरणही सकारात्मक राहते आणि संबंधित व्यक्तींना पुढील आयुष्यात अधिक चांगल्या पद्धतीने प्रगती करता येते, असेही जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

अपर जिल्हाधिकारी कार्यालयासोबतच प्रांताधिकारी कार्यालये, तहसील कार्यालये तसेच नायब तहसीलदारांच्या स्तरावरही महसूल लोक अदालतीच्या माध्यमातून प्रकरणांच्या निवारणाची कार्यवाही सुरू आहे. संबंधित पक्षकारांनी या संधीचा लाभ घेऊन प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यावेळी केले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चोरढे ता. मुरूड, जि. रायगड येथील खालिल वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. शर्मिला दिलीप पाटील यांचेकडुन खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबद्दल त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या पक्षकारांस संमती दिली आहे.

**मिळकतीचे चतु:सिमापुर्वक वर्णन**

| गावाचे नाव | ग. नं./हि. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे चोरढे ता. मुरूड | ४१९ | ००.३७.९० पो.ख. ००.०७.१० एकुण ००.४५.०० | ११.३७ |

(वर उल्लेखीत मिळकतीमधील सौ. शर्मिला दिलीप पाटील यांचे हिश्श्याची व ताबेकब्जातील सातबारा सदरी नोंद असलेली शेतजमीन क्षेत्र ००.१४.९० हे. आर. पो. ख. ००.०७.१० हे. आर. एकुण क्षेत्र ००.२२.०० हे. आर. आकार ४.४७ रू. पै हि मिळकत)

वर वर्णन केलेल्या गट नं. ४१९ मिळकतीच्या चतु:सिमा खालील प्रमाणे आहेत;
**पुर्वेस** - गट नं ४३३ ही मिळकत
**पश्चिमेस**- साळाव रोहा रस्ता
**दक्षिणेस**- गट नं. ४१९ पैकी उर्वरीत क्षेत्र.
**उत्तरेस**- गट नं ४२३ व ४२० ही मिळकत

सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी वरील मिळकत निर्वेध असल्याबाबत हवाला दिला आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, दान, गहाण, भाडेपट्टा, विकीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहीवाट, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र व पुराव्यासहीत सादर कराव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून कुणाचाही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक- ०७/१०/२०२६ सही/-
**ॲड. अभिषेक महेश पिसाट**
३, अलिबाग कमर्शिल कॉम्प्लेक्स,
बिग स्प्लॅश हॉटेल शेजारी,
ता. अलिबाग जि. रायगड.
मो. ९५९५०३२३२० ई मेल-abhipisat@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नांदगाव ता. मुरूड, जि. रायगड येथील खालिल वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. गजानन दत्तु दिवेकर यांचेकडुन खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबद्दल त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या पक्षकारांस संमती दिली आहे.

**मिळकतीचे चतुः सिमापुर्वक वर्णन**

| गावाचे नाव | ग.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे नांदगाव ता. मुरुड | ६०६/१ | ००.०७.६० पो.ख.००.००.८० एकुण ००.०८.४० | १.८८ |
| मौजे नांदगाव ता.मुरूड | ६०६/२ | ००.०७.६० पो.ख.००.००.७० एकुण ००.०८.३० | १.८७ |

(तसेच वर उल्लेखित गट नं. ६०६/१ या मिळकतीमधील घर क्र १९९ क्षेत्र १८२० चौ.फु. आणि गट नं. ६०६/२ या मिळकतीमधील घर क्र ११९१ क्षेत्र २२५ चौ.फु. या घर मिळकती)

वर उल्लेखित ग. नं. ६०६/१ यामिळकतीच्या चतुः सिमा
**पुर्वेस - अलिबाग-मुरूड रस्ता**
**पश्चिमेस -नांदगाव ग्रामपंचायतीचा माळीवाडा रस्ता**
**दक्षिणेस - गट नं ६११**
**उत्तरेस- गट नं ६०६/२ ही मिळकत**

**वर उल्लेखित ग. नं. ६०६/२ यामिळकतीच्या चतु:सिमा**
**पुर्वेस -अलिबाग-मुरूड रस्ता**
**पश्चिमेस-नांदगाव ग्रामपंचायतीचा माळीवाडा रस्ता**
**दक्षिणेस- गट नं.६०६/१ हि मिळकत**
**उत्तरेस-गट नं. ६०४ व ६०५ ही मिळकत**

सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी वरील मिळकत निर्वेध असल्याबाबत हवाला दिला आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, दान गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहीवाट, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र व पुराव्यासहीत सादर कराव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग सही /-
दिनांक ०७/१०/२०२६ **ॲड. अभिषेक महेश पिसाट**
३. अलिबाग कमर्शिल कॉम्प्लेक्स, बिग स्प्लॅश हॉटेल शेजारी, ता.अलिबाग जि.रायगड.
मो.९५९५०३२३२०, ई मेल abhipisat@gmail.com

## जाहीर नोटीस

दि. २१/०८/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक १) प्रकाश जानू गायकर २) राजेंद्र जानू गायकर ३) सौ. वंदना परशुराम पाटील (पुर्वाश्रमीची वंदना जानू गायकर) यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार |
|---|---|---|---|
| वावे ता. अलिबाग | ४७ | ०-१८-१० पो.ख ०-०१-०० एकुण ०-१९-१० | ४.३७ |

वर वर्णन केलेली मिळकत ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या २१ (एकवीस) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. (पळी आंबेघर), पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड. गट क्र. ४९/२/अ, जुना सर्व्हे क्र. ४९/ब १, क्षेत्र- २-२२-०० हे.आर., आकार - ३ -०० रू. पै. हि मिळकत विद्यमान मालक सौ. उषा किरण डहाणूकर यांजकडून वर वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी विकत घेण्याचे ठरविले असून तशी विद्यमान मालकाबरोबर चर्चा झालेली आहे.

वर वर्णन केलेली मिळकत रजिस्टर्ड कराराने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेबरोबर ठरलेले आहे. वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचाही गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, भागिदारी, बक्षिस, मृत्युपत्र, दान, ताबेकब्जा, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालू असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत लेखी स्वरुपात लेखीपुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे. असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागावून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग सही/-
ता. ०५/१०/२०२६ **ॲड. राजीव नथुराम शेरमकर**
ओबीएम रेसिडेन्सी, दुसरा मजला,
आनंद नगर, चेंढरे, अलिबाग,
ता. अलिबाग- रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक अंजली अनिल रानडे, रा. १ स्नेह बिल्डींग, विहारी, पो. खोपोली, ता.खालापूर, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर माझे अशिल यांनी केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | हि.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| वरंडे | ५५१ | - | ०-५८-१० | ११.१९ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ०-१२-९० | |
| | | एकूण | ०-७१-०० | |

वर नमूद भातशेती मिळकतीपैकी अंजली अनिल रानडे यांचे मालकीहक्कातील ०-१८-०० हे. आर. पो.ख. ०-०२-०० हे.आर., एकूण क्षेत्र ०-२०-०० हे. आर ., आकार रु. २.८४ पैसे या मिळकतीबाबत.

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/१०/२०२६ सही /-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**
**विशेष वसुली अधिकारी कार्यालय अलिबाग रायगड**
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११))**
**त्यावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग शाखा पोलादपूर चे वसुली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णीत ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटिस दिनांक २७/०७/२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक २१-०८-२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. महेश रमेश केसरकर व सौ. अरुणा महेश केसरकर यांच्यासह इतर न्यायनिर्णीत ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १५-०१-२०२६ पर्यंतची रक्कम रुपये ४,९५,७६९/- व दिनांक ३१.०५.२०२५ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सूचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १३.५ टक्के दराने भरण्यास संगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सूचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्व सामान्य जनतेला सूचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या आधिकारांचा वापर करून महसुली गाव - तुर्भे बु. तालुका - पोलादपूर, जिल्हा - रायगड हदीतील मिळकत क्रं. ग.नं १२०/८, क्षेत्र ०.९७.०० येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि पोलादपूर च्या दिनांक १५-०१-२०२६ पर्यंतची रक्कम रुपये ४,९५,७६९/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काच्या आधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

कर्जदार :- श्री. रमेश महेश केसरकर व सहकर्जदार अरुणा महेश केसरकर महसुली गाव तुर्भे बु. तालुका पोलादपुर, जिल्हा - रायगड येथील सौ. अरुणा महेश केसरकर यांच्या नावे असलेली मिळकत क्रं. १२०/८ क्षेत्रफळ ०.९७.०० आर

स्थळ-पोलादपूर सही/-
दिनांक-०३/१०/२०२६ **श्री एस.एस कदम**
विशेष वसूली व विक्री अधिकारी पोलादपूर रायगड
इतर रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक नितीन अशोक कुंटे यांचे कडुन कायम मालकी हक्कने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग | २४२२ | ०-०७-१० जिरायत ०-३०-५० बागायत ०-०२-०० पो.ख. ०-३९-६० एकुण | १२.६९ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये नितीन अशोक कुंटे यांच्या नावे असणारे एकुण क्षेत्र ०-२५-१० हे.आर., आकार ४ रू ७२ पैसे या बागायत जमिन मिळकतपैकी ०-०७-९० हे.आर. हि जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग **ॲड राहूल रमेश नाईक**
दिनांक : ०६/१०/२०२६ मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

अशी जाहीर नोटीस देण्यात येते की, आमची आशील श्रीमती. हालीमा इस्माइल नाडकर रा. वरचा मोहल्ला, अष्टमी, ता. रोहा, जि. रायगड, यांची वडीलोपार्जित सामाईक मालकीची खाली वर्णन केलेली जमिन मिळकत आहे. तिचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे. आर ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| सोगाव, ता. अलिबाग | १९ | ७२/१अ/१० | ००-०३-८ | ०.६६ |
| सोगाव, ता. अलिबाग | २९ | ७२/१अ/९ब | ०-४८-७ | ७.९४ |

सदर मिळकती संदर्भात आमचे आशील श्रीमती. हालीमा इस्माइल नाडकर यांनी रिझवान इसाक वाकणीस वगैरे १० यांज विरूद्ध सदर मिळकती संदर्भात मुंबई येथील मा. कोकण आयुक्त सो, कोकण विभाग मुंबई यांच्या न्यायालयामध्ये रिव्हीजन अर्ज क्र. १०११/२०२६ दाखल केलेला आहे. सदर रिव्हीजन अर्जाची सुनावणीची पुढील तारीख १९/१०/२०२६ अशी आहे.

सदर मिळकती संदर्भात कोणत्याही त्रयस्त इसमांनी कोणताही लेखी अगर तोंडी व्यवहार करू नये. तसेच कोणीही कुठलाही हक्क वा हितसंबध खरेदी, बक्षीस, लिज, वारसा, आदलाबदल, गहाण, दान, विश्वस्त निधी, दायित्व कब्जा, वहिवाट, जप्ती अगर कसलाही हक्क वा हितसंबंध निर्माण करू नये तसे केल्यास आमच्या आशिलांवर ते बंधनकारक असणार नाही. व तसा आमचे अशिलांचे संमतीविना केलेला सदर मिळकती संदर्भातील कोणताही व्यवहार बेकायदेशीर असेल. अशा स्वरूपाचा कोणताही व्यवहार कोणीही केल्यास त्यांचे विरूध्द आमचे अशिल कायदेशीर कारवाई करतील याची सर्वानी नोंद घ्यावी हे आपणास कळावे.

अलिबाग सही/-
ता. ०१/१०/२०२६ **ॲड.आर.एन. शेरमकर**
ओबीएम रेसिडन्सी,२०२
हालीमा इस्माईल नाडकर आनंद नगर, चेंढरे, अलिबाग,
ता.अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली सदनिका विद्यमान मालक श्री. अनिकेत सुभाष मदने यांच्या मालकीची सदनिका त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची सदनिका ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर सदनिकेच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे.

**सदनिकेचे वर्णन**

मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ३३/२/अ/ब/क/१,३३/२/अ/ब/क/२.३३/२/अ/ब/क/३ या मिळकतींवर बांधण्यात आलेल्या 'उत्कर्ष वास्तू को. ऑप. हौसिंग सोसायटी लि.' या इमारतीमधील बी विंग मधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका नं. बी-३०३ क्षेत्र ४१.०६ चौ.मी.बिल्टअप ज्याचा चेंढरे ग्रामपंचायत मालमत्ता क्र.१७९०/१५ क्षेत्र ६५५ चौ. फुट डी निवासी सदनिका या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल निवासी सदनिकेच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील निवासी सदनिकेच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची निवासी सदनिका निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या निवासी सदनिकेचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. मानस सुधाकर पाटील**
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं.७७४३८०९६५३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे बलिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| गणपत शंकर बदे, दुंदा चिंधु शेळके, नामदेव तुकाराम कोंडीलकर | ८२ | ३ | १-००-८० | ० | ६५ |

या एकुण क्षेत्रापैकी खरेदी देणार यांचे मालकीचे क्षेत्र हे. ०, आर.-८०, पॉ.- ८० इतक्या क्षेत्राबाबत

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं. १, सही / -
तळमजला, साईकृपा सोसायटी, **ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, दिनांक :- ०७/१०/२०२६
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०१०१ मो. नं. ९३७२९६४६६५

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकतीचे मालक श्री. विशाल दिलीप माळी रा. गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड.**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ३७/१/ब | एकूण क्षेत्र ०-२७-०६ यापैकी विशाल दिलीप माळी यांचे अविभक्त हिस्स्याचे ०-१८-०४ | ३-३१ |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०७/१०/२०२६ सही/-
**ॲड. गणपत का.फुलावरे ॲड.गीतांजली जी.फुलावरे**
कार्यालय पत्ता: "मधुतारा बिल्डींग" गाळा नं.३
कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ८८८८०४५३७६/७७७५९९३०८८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे खानाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नंबर १९/२/अ, क्षेत्र ०-१५-४० हे. आर., पो.ख. ०-०१-८० हे. आर. एकूण क्षेत्र ०-१७-२० हे. आर., आकार २.७५ रू.पै., ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनिल बापु नाईक रा. मु. पाल्हे, नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०६/१०/२०२६ **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून, त्या अनुषंगाने सदर मिळकतीचे विद्यमान मालक - (१) सरस्वती बळीराम म्हात्रे (२) चंद्रभानू बळीराम म्हात्रे (३) सुनिल बळीराम म्हात्रे (४) तेजस्विनी विश्वनाथ ठाकूर (५) वृंदा आदेश म्हात्रे यांचे मालकी हक्क आम्ही तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरूपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास, सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्काची आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच संबंधितांनी आपला दावा, मागणी अथवा आक्षेप सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणी जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील, मौजे वैजाळी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथे स्थित असलेली गट क्रमांक १२४, एकूण क्षेत्रफळ ००.१०.९० हे.आर.चौ.मी. (लागवडीयोग्य क्षेत्र ००.०९.४० हे.आर.चौ.मी. व पोटखराब क्षेत्र ००.०१.५० हे.आर.चौ.मी.), आकारणी रु. २.६९, ही संपूर्ण शेतजमीन, तिजवरील सर्व हक्क, सुविधाधिकार, वहिवाट व अनुषंगिक लाभांसह.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ७ ऑक्टोबर २०२६
क्वाड्रा लीगल करीता
सही /-
**विक्रांत झुंजारराव**
(+९१९८३३६२५१९५)

## जाहीर नोटीस

दि. : ०६/१०/२०२६

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी १. श्री. दिनेश बाबुलाल संघवी, २. श्री चिंतनकुमार दिनेशकुमार संघवी आणि ३. श्रीमती पूर्वी रोनक बाफना यांच्या खुद्द सामाईक मालकीच्या व प्रत्यक्ष ताबें कब्जा वहिवाटीतील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिल मे. गोल्डन व्ह्यु बिल्डर्स ॲन्ड डेवलपर्स तर्फे प्रोप्रा. श्री. हनुमंत पांडुरंग चव्हाण, पत्ता - ऑफिस नं. वाय- ३११०, तळ मजला, अक्षरा बिझनेस पार्क, सेक्टर- २५, तुर्भे मार्केट, वाशी, नवी मुंबई, जि. ठाणे ७००७०३ यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे उसरोली, ता.- खालापुर, जि.- रायगड येथील**

| अ. क्र. | स. नं. | हि. नं. | क्षेत्र हे.-आर.चौ.मी | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.=पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२ | ६ | ०-३९-०० | ३९०० | ०=६५ |
| २ | १७ | १२ | ०-१५-०० | १५०० | ०=४० |
| ३ | १७ | १४ | ०-०५-०० | ५०० | ०=१० |
| ४ | १७ | १६ | ०-१८-०० | १८०० | ०=३० |
| ५ | १७ | १७ | ०-२४-०० | २४०० | ०=५५ |
| ६ | १७ | २८ | ०-१३-४० | १३४० | ०=२२ |
| ७ | १९ | ७ | ०-२९.८० | २९८० | ०=४५ |
| ८ | १९ | ८/A | ०-१४.३० | १४३० | ०=२५ |
| ९ | १९ | ८/B | ०-१४.०० | १४०० | ०=२५ |
| १० | १९ | १४ | ०-१०.९० | १०९० | ०=२० |
| ११ | १९ | ९ | ०-०२.५० | २५० | ०=०५ |
| १२ | २० | ४ | ०-५१.०० | ५१०० | ०=६५ |
| १३ | २० | ५ | ०-५५.०० | ५५०० | ०=८५ |
| १४ | २० | ७ | ०-४५.०० | ४५०० | ०=८० |
| १५ | २१ | ४/A | ०-४३.०० | ४३०० | ०=५५ |
| १६ | २१ | ४/B | ०-३३.०० | ३३०० | ०=४० |
| १७ | २१ | ४/D | ०-४१.०० | ४१०० | ०=५५ |
| १८ | २१ | ६ | ०-११.३० | ११३० | ०=२० |
| १९ | २१ | १० | ०-१९.८० | १९८० | ०=३० |
| २०. | २१ | १२ | ०-१६.८० | १६८० | ०=२५ |
| २१ | २३ | ५ | ०-११.०० | ११०० | ०=२० |
| २२ | २३ | ७ | ०-४०.०० | ४००० | ०=५० |
| २३ | २३ | ९ | ०-२१.०० | २१०० | ०=३५ |
| २४ | २३ | ११ | ०-२१.०० | २१०० | ०=३५ |
| २५ | २३ | १२ | ०-१८.०० | १८०० | ०=३० |
| २६ | २३ | १४ | ०-५५.०० | ५५०० | ०=९० |
| २७ | २३ | १७ | ०-५३.०० | ५३०० | ०=९० |
| २८ | २३ | १९ | ०-२१.०० | २१०० | ०=३५ |
| २९ | २३ | २० | ०-२२.०० | २२०० | ०=३५ |
| ३० | २३ | २२ | ०-२९.०० | २९०० | ०=५० |
| | | Total | ०७-९२.८० | ७९२८० | |

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर तत्सम कोणतेही हक्क- हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास अशा हितसंबंधी व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील १. श्री. दिनेश बाबुलाल संघवी, २. श्री चिंतनकुमार दिनेशकुमार संघवी आणि ३ श्रीमती पूर्वी रोनक बाफना यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दिनांक ०७/१०/२०२६. **श्री. संदीप रमाकांत जगे, ॲडव्होकेट**
पत्ता :- फ्लॅट नं. ०२, जयनगर 'ए' को. ऑप.
सोसा. लि., कोर्ट रोड, ५२ बंगला,
पनवेल ४१० २०६, जि. रायगड.
फोन नं. (०२२) २७४५४५४८.
मोबाईल नं. ०९३२४४५४५४८.

## निवडक



### आयुष मुंबईचा उपकर्णधार

**मुंबई :** आगामी रणजी करंडक स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यासाठी आयुष म्हात्रेची मुंबई संघाच्या उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वालचा मुंबईच्या १६ सदस्यीय संघात समावेश करण्यात आला आहे. विक्रमी ४२ वेळा विजेतेपद पटकावणारा मुंबई संघ ११ ते १५ ऑक्टोबर दरम्यान चंदीगडविरुद्ध आपला पहिला सामना खेळणार असून हा सामना वानखेडे स्टेडियमवर होणे अपेक्षित आहे. मुंबई आणि चंदीगड संघ हरयाणा, राजस्थान, रेल्वे, तमिळनाडू आणि उत्तराखंड यांच्यासह एलिट-ड गटात समाविष्ट आहेत. या संघात भारताचा फलंदाज सर्फराझ खान याचाही समावेश आहे, जो यापूर्वी इराणी कपमध्ये जम्मू-काश्मीरविरुद्ध रेस्ट ऑफ इंडियाच्या विजयात सहभागी झाला होता. तसेच, ऑस्ट्रेलिया-अ संघाविरुद्धच्या दोन सामन्यांच्या अनधिकृत कसोटी मालिकेत भारताला १-० ने विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा अष्टपैलू खेळाडू शम्स मुलानीचाही संघात समावेश आहे. १९ वर्षांखालील विश्वचषक विजय मिळवून देणाऱ्या म्हात्रेची संघाच्या उपकर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, मुंबईचा माजी कर्णधार आणि भारताचा अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूर दुखापतीमुळे उपलब्ध नसल्याचे समजते.

### गांगुली दिल्ली कॅपिटल्सचे मुख्य प्रशिक्षक

**नवी दिल्ली :** माजी भारतीय कर्णधार सौरव गांगुली यांची दिल्ली कॅपिटल्सच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते आगामी आयपीएल हंगामात संघाची जबाबदारी सांभाळतील.गांगुलींनी यापूर्वी दिल्ली कॅपिटल्ससोबत क्रिकेट संचालक म्हणून काम केले आहे. २०२५ मध्ये प्रिटोरिया कॅपिटल्सचे मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांनी पहिली प्रशिक्षकाची भूमिका स्वीकारली होती.गांगुली यांनी आयपीएलमध्ये ५९ सामन्यांत १,३४९ धावा केल्या. त्यांची सर्वोत्तम धावसंख्या ९१ धावा होती आणि त्यांनी ७ अर्धशतके झळकावली. त्यांनी आयपीएलमध्ये कोलकाता नाइट रायडर्स आणि पुणे वॉरियर्स इंडिया या संघांचे नेतृत्वही केले. गांगुली यांचे आयपीएल पदार्पण २००८ मध्ये केकेआरकडून झाले आणि त्यांनी शेवटचा सामना २०१२ मध्ये पुणे वॉरियर्सकडून खेळला. गोलंदाज म्हणून त्यांच्या नावावर १० विकेट्सही आहेत.



### डॅनिल मेदवेदेव चायना ओपनमधून अपात्र

**बीजिंग :** बीजिंगमध्ये खेळल्या जात असलेल्या चायना ओपनच्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत रशियाच्या डॅनिल मेदवेदेवला नोवाक जोकोव्हिचविरुद्धच्या सामन्यात बाद करण्यात आले. दुसऱ्या सेटमधील ९व्या गेममध्ये मेदवेदेवने कोर्टवर उडत आलेला चेंडू स्टँड्सच्या दिशेने मारला. चेंडू पहिल्या रांगेत बसलेल्या एका प्रेक्षकाच्या डाव्या डोळ्याजवळ लागला. त्यामुळे तो जखमी झाला.घटनेनंतर सामनाधिकारी आणि पर्यवेक्षकांनी मेदवेदेवला सामन्यातून बाहेर केले. या निर्णयामुळे जोकोव्हिच सामना पूर्ण न खेळताच अंतिम फेरीत पोहोचला. २ तास ३० मिनिटे चाललेल्या सामन्यात जोकोव्हिचने पहिला सेट ७-५ असा जिंकला होता. दुसऱ्या सेटमध्ये तो ५-३ असा आघाडीवर होता आणि विजयापासून फक्त तीन पॉइंट्स दूर होता. त्याच वेळी कोर्टवर बाउन्स होऊन परत आलेला चेंडू मेदवेदेवने स्टँड्सच्या दिशेने मारला.चेंडू थेट प्रेक्षकांमध्ये जाऊन एका चाहत्याला लागला. त्याला तातडीने वैद्यकीय मदत देण्यात आली आणि स्टँड्समधून बाहेर नेण्यात आले.घटनेनंतर लगेचच मेदवेदेवने प्रेक्षकाच्या दिशेने हात उंचावून माफी मागितली. सामन्यानंतर त्यांनी सांगितले की, त्यांनी रागाच्या भरात चेंडू मारला नव्हता.मेदवेदेव म्हणाले, हा १०० टक्के अपघात होता. मी रागाच्या भरात चेंडू मारला नव्हता. चेंडू बाऊन्स होऊन परत येत होता. त्यामुळे मी तो अशाच प्रकारे मारण्याचा प्रयत्न केला.



# आयसीसी पुरस्कारासाठी नामांकनाची घोषणा

## || शुभमन-अभिषेकसह चार क्रिकेटपटू || शेफाली-श्री चरणीही प्लेयर ऑफ द मंथच्या शर्यतीत



| मुंबई | प्रतिनिधी |

भारतीय कर्णधार शुभमन गिल, अभिषेक शर्मा, शेफाली वर्मा आणि श्री चरणी यांना सप्टेंबर महिन्याच्या आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. आयसीसीने मंगळवारी सप्टेंबर महिन्यासाठी पुरुष आणि महिला गटातील नामांकनांची घोषणा केली.पुरुष गटात गिल आणि अभिषेक यांच्यासोबत झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा याला स्थान मिळाले आहे. तर, महिला गटात शेफाली आणि श्री चरणी यांच्याशिवाय श्रीलंकेची कर्णधार चमारी अटापट्टू हिला नामांकन मिळाले आहे.

भारतीय कर्णधार शुभमन गिलने सप्टेंबरमध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या २ वनडे सामन्यांत ३३३ धावा केल्या. त्याने पहिल्या वनडेत ११० धावांची खेळी केली. त्यानंतर दुसऱ्या वनडेत १३३ चेंडूंमध्ये २२३ धावा केल्या. हे वनडे इतिहासातील सर्वात वेगवान द्विशतक आहे.गिलच्या खेळीच्या जोरावर भारताने ४०६ धावांचे लक्ष्य ८ गडी राखून आणि ३९ चेंडू शिल्लक ठेवून गाठले. गिल पाचव्यांदा प्लेयर ऑफ द मंथ पुरस्काराच्या शर्यतीत आहे.

### मतदानाद्वारे विजेत्यांची निवड

आयसीसीची स्वतंत्र मतदान अकादमी आणि जगभरातील चाहते विजेत्यांची निवड करतील. मतदानात अकादमीच्या मतांना ९०% आणि चाहत्यांच्या मतांना १०% महत्त्व असेल. विजेत्यांची घोषणा दर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आयसीसीच्या डिजिटल चॅनेल्सवर केली जाते.

### सिकंदर रझाही पुरुष गटात नामांकित

झिम्बाब्वेचा अष्टपैलू सिकंदर रझाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या घरच्या वनडे मालिकेत ५७, ४५ आणि नाबाद ८१ धावा केल्या. त्याने ३ वनडेमध्ये १८३ धावा करण्यासोबतच ३ बळीही घेतले.यादरम्यान त्याचा स्ट्राइक रेट ९२.८९ आणि इकॉनॉमी रेट ५.४६ राहिला. ३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत त्याने ९० धावा केल्या आणि २ बळी घेतले.

### अभिषेकने ३० चेंडूंमध्ये शतक झळकावले

अभिषेक शर्माने सप्टेंबरमध्ये ४ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये २२९ धावा केल्या. अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात त्याने ३४ चेंडूंमध्ये १०८ धावा केल्या. या खेळीत अभिषेकने ३० चेंडूंमध्ये शतक पूर्ण केले, जे कोणत्याही भारतीय फलंदाजाचे सर्वात वेगवान टी-२० आंतरराष्ट्रीय शतक आहे.त्याने रोहित शर्माच्या ३५ चेंडूंमध्ये शतक करण्याच्या विक्रमाला मागे टाकले.

### श्री चरणीने ७ सामन्यांत १८ बळी घेतले

भारतीय फिरकीपटू श्री चरणीने सप्टेंबरमध्ये ७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत १८ बळी घेतले. तिचा इकॉनॉमी रेट ३.३० राहिला. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम सामन्यात तिने श्रीलंकेविरुद्ध १३ धावा देत २ बळी घेतले. यानंतर चरणी महिला टी-२० गोलंदाजी क्रमवारीत ८१७ रेटिंग गुणांवर पोहोचली, जो या प्रकारातील आतापर्यंतचा सर्वोच्च रेटिंग स्कोअर आहे.

### शेफाली आणि चमारीही शर्यतीत

शेफाली वर्माने सप्टेंबरमध्ये ३६० धावा केल्या आणि ६ बळी घेतले. महिला आशिया कपमध्ये ती सर्वाधिक धावा करणारी फलंदाज ठरली. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात तिने बांगलादेशविरुद्ध नाबाद १०० धावा, तर अंतिम सामन्यात श्रीलंकेविरुद्ध ४८ धावा केल्या. श्रीलंकेची कर्णधार चमारी अटापट्टूने ७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत २२६ धावा करण्यासोबतच १४ बळी घेतले. महिला आशिया कपमध्ये इंडोनेशियाविरुद्ध तिने ५ धावा देत ७ बळी घेतले आणि हॅट्ट्रिकही साधली.

## भुवनेश्वर कुमारच्या हाती कर्णधारपदाची धुरा

**मुंबई :** भुवनेश्वर कुमार बऱ्याच काळापासून भारतीय संघाबाहेर आहे. २०२२ मध्ये आपला शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळलेल्या भुवनेश्वर कुमारने आरसीबीसाठी आयपीएलचा हा हंगाम दमदार खेळला आहे. त्याचा भारतीय आंतरराष्ट्रीय संघात समावेश करण्यात आलेला नाही, परंतु ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान हाँगकाँगमध्ये खेळल्या जाणाऱ्या स्पर्धेसाठी त्याला हाँगकाँग सिक्सर्स संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.



या स्पर्धेत सहा-सहा खेळाडूंचे सामने असतात. प्रत्येक संघात सहा खेळाडू असतात. ही स्पर्धा एका पूर्ण क्रिकेट सामन्याचा थरार एका वेगवान स्वरूपात सादर करते. ज्यात चौकार, नवीन फटके, खेळपट्ट्या आणि झपाट्याने बदलणारी सामन्याची समीकरणे यांचा समावेश असतो. भुवनेश्वर कुमारच्या नेतृत्वाखाली सात सदस्यीय भारतीय संघाची निवड करण्यात आली आहे.

या संघात समाविष्ट असलेले सर्व खेळाडू सध्या आयपीएलमध्ये खेळत आहेत. कोणीही अद्याप निवृत्त झालेले नाही. यामध्ये कृणाल पांड्या, शशांक सिंग, राहुल तेवतिया, नितीश राणा, राहुल त्रिपाठी आणि टी. नटराजन यांचा समावेश आहे.

## शलोक माळीने पटकावले सुवर्णपदक

राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धा

| रसायनी | प्रतिनिधी |

वसई येथे आयोजित विभागीय शालेय तायक्कांदो स्पर्धेत रसायनी येथील पिल्लई एचओसीएल स्कूलचा विद्यार्थी शलोक सचिन माळी याने दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर अकोला येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय तायक्कांदो स्पर्धेसाठी मुंबई विभागातून शलोकची निवड झाली आहे.



या विभागीय स्पर्धेत पिल्लई एचओसीएल स्कूलच्या एकूण पाच विद्यार्थ्यांनी पदके मिळवत शाळेच्या नावलौकिकात भर घातली. शलोक माळीने सुवर्णपदक मिळविले, तर आराध्य कदम याने रौप्यपदक पटकावले. तसेच दीप कोंडीलकर, मयुरेश माने आणि ऐश्वर्या राठोड यांनी कांस्यपदक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका रीमा निकाळजे, मॅनेजमेंट प्रतिनिधी आर. बी. पाटील आणि स्पोर्ट्स डायरेक्टर पद्माक्षण यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शलोक माळीच्या राज्यस्तरीय निवडीबद्दल विशेष कौतुक करून त्याला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेतील क्रीडा शिक्षक तसेच तायक्कांदो प्रशिक्षक सचिन माळी यांचे मार्गदर्शन आणि प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याने त्यांचेही यावेळी अभिनंदन करण्यात आले.

शलोक माळीच्या राज्यस्तरीय निवडीमुळे रसायनी परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, अकोला येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेतही तो उल्लेखनीय कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



## नांदगाव विद्यालयाची भरीव कामगिरी

| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड यांच्या वतीने ग. बा. वडेर हायस्कूल व व. ग. ओसवाल ज्युनियर कॉलेज सुधागड-पाली येथे कबड्डी तर आत्मोन्नती विद्यामंदिर जांभूळपाडा यांच्यावतीने सुधागड तालुका स्तरीय खो खो पावसाळी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगावच्या १७ वर्ष वयोगटातील कबड्डी स्पर्धेत मुली द्वितीय क्रमांक तसेच १७ वर्ष वयोगटात खो-खो स्पर्धेत मुले प्रथम क्रमांक,१४ वर्ष वयोगट मुले द्वितीय क्रमांक यावेळी स्पर्धेत विजयी झालेल्या खेळाडूंचे ट्रॉफी देऊन अभिनंदन करण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे, प्राचार्य, क्रीडा शिक्षक व सर्व शिक्षकवृंदाने विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### हरमनप्रीतने कर्णधारपद सोडले

**मुंबई :** हरमनप्रीत कौरने भारतीय महिला क्रिकेट संघाचे कर्णधारपदसोडण्याचीघोषणाकेली आहे. तिने मंगळवारी इन्स्टाग्राम पोस्टद्वारे याची माहिती दिली. हरमनप्रीतच्या जागी स्मृती मंधाना टीमची नवी कर्णधार बनू शकते.हरमनप्रीतच्या नेतृत्वाखाली भारताने २०२५ चा महिला वनडे विश्वचषक जिंकला. तिच्या नेतृत्वाखाली संघाने २०१२, २०१६, २०२२ आणि २०२६ आशिया कपचे विजेतेपदही पटकावले. दरम्यान, २०१२ च्या आशिया कपमध्ये हरमनप्रीतने केवळ अंतिम सामन्यात कर्णधारपद भूषवले होते.



## विरारमध्ये रंगणार राज्यस्तरीय कबड्डीचा थरार

### ■ महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांचे ५० संघ आमनेसामने

| विरार | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, पालघर जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने वसई-विरारमध्ये भव्य राज्यस्तरीय कुमार-कुमारी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सर्वोत्तम कबड्डीपटूंचा कस पाहणारी ही स्पर्धा राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघाच्या निवडीसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

या मानाच्या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील तब्बल २५ जिल्ह्यांमधून कुमार आणि कुमारी अशा दोन्ही गटांचे मिळून ५० संघ सहभागी होत आहेत. राज्यभरातून आलेले तब्बल ८०० अव्वल खेळाडू या स्पर्धेत आपली चुणूक दाखवतील. या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावरच राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा अधिकृत कबड्डी संघ निवडला जाणार आहे.

### ६ मॅट कोर्ट आणि भव्य प्रकाशझोत

स्पर्धेचे स्वरूप आणि दर्जा आंतरराष्ट्रीय मानकांनुसार ठेवण्यात आला आहे. यासाठी मैदानात ६ मॅट कोर्ट उभारण्यात आले असून रात्रं-दिवस सामने खेळवण्यासाठी भव्य प्रकाशझोत (डे-नाईट लाईट्स) व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सुमारे ११०० ते १२०० खेळाडू, प्रशिक्षक आणि पदाधिकाऱ्यांच्या निवासाची आणि भोजनाची अत्यंत उत्तम व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली आहे.

### पालघर जिल्ह्याला पुन्हा विजेतेपदाची आस

गतवर्षी पार पडलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत कुमारी गटात पालघर जिल्ह्याच्या मुलींनी अप्रतिम कामगिरी करत अंतिम विजेतेपद पटकावले होते. त्यामुळे यंदा मायदेशात खेळताना कुमारी गटासोबतच कुमार गटातही सुवर्णचषक पटकावण्याचा ठाम विश्वास यजमान पालघर जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि आयोजकांनी व्यक्त केला आहे.

नव्या स्पर्धांवर २०३१ पर्यंत ब्रेक | वर्ल्ड क्लब चॅम्पियनशिपचं काय होणार?

# बीसीसीआयसमोर आयसीसीचा प्लॅन बारगळला!

| मुंबई | प्रतिनिधी |

आयसीसीला मोठा धक्का बसला आहे. भारत, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्या तीव्र विरोधानंतर आयसीसीने किमान २०३१ पर्यंत कोणतीही नवीन स्पर्धा सुरू न करण्याचा निर्णय घेतला आहे. क्रिकेटला पुनरुज्जीवित करण्याच्या आणि महसूल वाढवण्याच्या उद्देशाने जागतिक क्लब चॅम्पियनशिप आणि इतर बहु-संघीय स्पर्धा सुरू करण्याच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या योजनांना स्थगिती देण्यात आली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, भारत, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडकडून झालेल्या तीव्र विरोधानंतर आयसीसीने किमान २०३१ पर्यंत कोणतीही नवीन स्पर्धा सुरू न करण्याचा निर्णय घेतला आहे. दुबई येथे झालेल्या आयसीसी क्रिकेट ऑपरेशन्स कार्यशाळेत अनेक महिने चाललेल्या चर्चे नंतर ही बैठक कोणत्याही नवीन स्पर्धेच्या प्रस्तावांशिवाय संपली. अहवालानुसार, अमेरिकन सल्लागार संस्था मॅकिन्से अँड कंपनीच्या एका धोरणात्मक अहवालावर आधारित आयसीसीने अधिक महसूल मिळवण्यासाठी अनेक नवीन कल्पना मांडल्या होत्या.

यामध्ये टी २० फ्रँचायझी संघांमध्ये जागतिक क्लब चॅम्पियनशिप आणि रिक्त कालावधीत चार-देशीय टी २० स्पर्धा आयोजित करण्याच्या योजनेचा समावेश होता. भारत, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडने हे स्पष्ट केले की, खेळाडूंच्या व्यस्त वेळापत्रकात नवीन स्पर्धांसाठी जागा नाही. नवीन स्पर्धा समाविष्ट करण्यासाठी आयसीसीला सध्याचा एकदिवसीय विश्वचषक, टी २० विश्वचषक किंवा चॅम्पियन्स ट्रॉफी यांसारख्या प्रमुख स्पर्धा रद्द कराव्या लागतील, जे शक्य नाही.

आगामी फ्युचर टूर्स प्रोग्राममधील एकमेव मोठा संभाव्य बदल म्हणजे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा विस्तार असू शकतो. पुढील वर्षापासून मध्ये नऊ संघांऐवजी १२ संघांचा समावेश केला जाऊ शकतो. अफगाणिस्तान, आयर्लंड आणि झिम्बाब्वे यांचाही टेस्ट चॅम्पियनशिपच्या चक्रात समावेश होण्याची शक्यता आहे, जरी आयसीसीने अद्याप आपली अधिकृत योजना सदस्य मंडळांना पाठवलेली नाही.

आयसीसीच्या योजना नाकारून तीन प्रमुख मंडळांनी २०३१ पर्यंतचे आपले द्विपक्षीय वेळापत्रक निश्चित केले आहे. पुढील विश्वचषक स्पर्धा पुढील उन्हाळ्यात अॅशेस मालिकेने सुरू होईल. त्यानंतर २०२९-३० मध्ये इंग्लंडचा ऑस्ट्रेलिया दौरा होईल. इंग्लंड २०२८ च्या सुरुवातीला भारतात पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळेल. त्यानंतर २०२९ मध्ये भारताचा इंग्लंडमध्ये पाच कसोटी सामन्यांचा दौरा होईल.

कुमार-कुमारी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

## विवेक शिंदे, संजीवनी कोरडे यांच्याकडे नेतृत्वाची धुरा

| ठाणे | प्रतिनिधी |

ठाणेजिल्हाकबड्डीअसोसिएशने कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेकरिता संघ जाहीर केले. विवेक शिंदेकडे कुमार, तर रा. फ. नाईक संघाच्या संजीवनी कोरडेकडे कुमारी गटाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली. पालघर जिल्हा कबड्डी असोसिएशन वसई, विरार महानगर पालिकेच्या सौजन्याने या स्पर्धेचे आयोजन केले आहे.



कुमार संघांमध्ये विवेक शिंदे (संघनायक)-श्री स्वामी समर्थ मंडळ, स्मित पाटील-लवलाईन स्पोर्ट्स, प्रसाद बोंबले-ओम् कबड्डी संघ, स्वरूप साळुंखे-श्री मावळी मंडळ, मनीष धनावडे-ग्रीफिन्स स्पोर्ट्स, ध्रुव लोखंडे- बास्को स्पोर्ट्स, वेदांत ढमाले-ग्रीफिन्स स्पोर्ट्स, निखिल गायकर-जय बजरंग, वाशिंद, माणिक राठोड-नव तरुण मंडळ, वेदान्त खाडे-श्री विठ्ठल मंडळ, मयुरेश वाघ-बास्को स्पोर्ट्स, सुजल गायकर-बास्को स्पोर्ट्स, विभव पाटील-लव लाईन स्पोर्ट्स, स्वरूप कदम-श्री मावळी मंडळ, प्रशिक्षक काळीराम म्हात्रे आणि सहायक प्रशिक्षक पुंडलिक गोरले यांचा समावेश आहे.

कुमारी संघामध्ये संजीवनी कोरडे (संघनायिका)- रा. फ. नाईक, ज्ञानेश्वरी इंटकी-छत्रपती शाहू महाराज, योगिनी म्हात्रे-शिवकन्या मंडळ, श्वेता कदम-स्फूर्ती मंडळ, आरती शेळके-रा. फ. नाईक, रूपाली सोनार-प्रेरणा कला-क्रीडा, जान्हवी पार्टे-जय आंबे, सोनम पंडित-छत्रपती शाहू महाराज, सेरेना पुणेजा-शिवकन्या मंडळ, जान्हवी आमकार-जय आंबे, धानी राणे-ज्ञानशक्ती मंडळ, वैभवी कासार-नव तरुण, वैभवी सिंग-डी. व्ही. एस, प्रणाली मालुसरे-अश्वमेघ मंडळ, प्रशिक्षिका निकिता म्हात्रे (कदम) आणि सहायक प्रशिक्षिका प्रियंका मोरे (जाधव) यांचा समावेश आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)